cmyk

## संपादकीय

### टीम इंडियात विश्वासाची भावना तयार व्हावी !

देशातील अनेक राज्यांत सध्या भाजपची सत्ता असली, तरी भाजपला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांची सरकारेही काही राज्यांमध्ये आहेत. या राज्यांशी व्यवहार करत असताना केंद्र सरकार दुजाभाव करत असल्याचा आरोप नेहमीच या राज्यांकडून केला जातो. दुसरीकडे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी आणि चांगल्या योजनांना विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये महत्त्व दिले जात नाही. या योजनांचा फायदा तळागाळापर्यंत जाणीवपूर्वक पोहोचू दिला जात नाही अशा प्रकारचा आक्षेप केंद्र सरकारकडूनही घेतला जातो.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### अवकाळी पावसामुळे भाज्यांचे दर कडाडले

बीड- अवकाळी पावसामुळे भाज्यांची आवक कमी झाली असून त्याचा थेट परिणाम भाजीपाल्यांच्या दरांवर झाला आहे. मेथी, कांद्याची पात, शेवग्याची शेंग, माठ, अळूची पाने, कोथिंबीर यासह इतर भाज्यांचे दर वाढले आहेत. मे महिन्यात पाऊस सुरू झाल्याने त्याचा परिणाम भाज्यांवर झाला असन. भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३३ | मंगळवार, दि.२७ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# वापसा येत नाही तोपर्यंत पेरणी करू नका!

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात रविवारी मान्सून दाखल झाला आहे. सोमवारी राज्याच्या विविध भागात मान्सूनची आगेकूच सुरु झाली आहे. त्यामुळे अनेक भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. दरम्यान, राज्यात मान्सूनपूर्व पावसाने देखील जोरदार हजेरी लावली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, जमिनीत पुरेशी ओल देखील गेली आहे. मात्र पेरणी करण्याची घाई न करता शेतकऱ्यांनी वापसा आल्यावर पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला आहे.**

## राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

राज्यातील अनेक भागात मान्सूनपूर्व पाऊस झाल्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. जिथे जास्त पाऊस झाला आहे, त्याठिकाणच्या शेतकऱ्यांना थांबावे लागेल. जोपर्यंत वापसा येत नाही तोपर्यंत पेरणी करता येणार नाही अशी माहिती कृषी विभागाने दिली आहे. जिथे जास्त पाऊस झाला आहे तिथे वापसा आल्यावर पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला आहे. दरम्यान, राज्यातील



### राज्यातील ३४ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान

उन्हाळी हंगामात पिकं, फळ पिकं काढणीला आली आहेत. मान्सूनपूर्व पावसामुळे राज्यातील ३४ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्याठिकाणी पंचनाम्याच्या सूचना दिल्या आहेत. पंचनामा पूर्ण झाला की त्याचा संबंधित अहवाल राज्य शासनाला देण्यात येईल, अशी माहिती पुणे विभागाचे कृषी संचालक र. शा. नाईकवाडी यांनी दिली आहे. ११ दिवस आधीच मान्सून दाखल झाला आहे. राज्यात १४० मिलिमीटर मान्सूनपूर्व पाऊस झाला आहे. त्यामुळे वापसा होईपर्यंत शेतकऱ्यांनी थांबावे असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

विविध भागात आता मान्सून दाखल होण्यास सुरुवात झाली आहे . सोमवार सकाळपासून मुंबईसह कोकण किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची जोरदार बॅटिंग सुरु आहे. अरबी समुद्र खवळला असून सकाळी समुद्राला भरती आल्याने मोठमोठ्या लाटा उसळत आहेत. पान २ वर

## थोडक्यात...

### राज ठाकरेंचा अवघ्या तीन तासांचाच नाशिक दौरा

नाशिक–मनसे अध्यक्ष राज ठाकरे नाशिकहुन मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी नाशिकमध्ये पदाधिकाऱ्यांचा आढावा घेतला. राज ठाकरे नाशिकवरुन पुण्याला जाणार होते. मात्र दौरा अर्धवट सोडून ते मुंबईच्या दिशेने रवाना झाले.

### कृष्णा, वारणा नद्या दुथडी भरून वाहू लागल्या

सांगली –जिल्ह्यामध्ये गेल्या आठ दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे कृष्णा आणि वारणा नदीच्या पाणी पातळीमध्ये वाढ झालेली आहे. सांगली शहरातल्या आयर्विन पूल या ठिकाणी पाण्याची पातळी आता १६ फुटांवर पोहचलेली आहे. सकाळपासून या पाण्याच्या पातळीमध्ये एक फुटाने वाढ झाली आहे. त्यामुळे कृष्णा व वारणा नदी दुथडी भरून वाहू लागलेली आहे.

### अमित शाह यांच्याकडून फडणवीसांचे कौतुक

नागपूर–अमित शाह यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुककरण्यात आले आहे . फडणवीसांच्या संकल्पनेतून नागपुरात कॅन्सर इन्स्टिटयूट साकरले आहे. सरकारने गरिबांसाठी ५ लाखापर्यंत उपचार मोफत केला असून गेल्या १० वर्षात आरोग्य क्षेत्रात सरकारने खूप काम केलय असे अमित शाह म्हणाले.

### अजित पवार यांच्याकडून नुकसानीची पाहणी

बारामती–राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. बारामतीमधील काटेवाडी परिसरात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या भागातील नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली.

### देशभरात कोरोनाचे १ हजार रुग्ण

नवी दिल्ली– देशभरात पुन्हा एकदा कोरोनाने डोके वर काढले आहे. आतापर्यंत देशभरात १ हजाराहून अधिक कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी ७५२ रुग्णांची गेल्या पाच–सहा दिवसांत नोंद झाली आहे. सध्या सर्वाधिक कोरोनाबाधित रुग्ण केरळमध्ये आहेत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ६४.५० क्विंटल** | | |
| २,२७० | ३,००० | २,६३८ |
| **ज्वारी/हायब्रिड : ७१.०० क्विंटल** | | |
| १,९१० | ३,१७० | २,४६४ |
| **मका/लोकल:३३.५०क्विंटल** | | |
| ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| **तूर : ३.५० क्विंटल** | | |
| ६,५५० | ६,६०० | ६,५७५ |
| **उडीद : १.०० क्विंटल** | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| **बाजरी: १११.५० क्विंटल** | | |
| २,२५० | २,६५२ | २,४९० |
| **मुग :४.५० क्विंटल** | | |
| ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| **सोयाबीन: १७.५० क्विंटल** | | |
| ४,००० | ४,३०० | ४,१६६ |
| **हरभरा: २.५० क्विंटल** | | |
| ५,३५१ | ५,४०० | ५,५८७ |

# मुंडे साहेबांचा सच्चा शिलेदार हरपला

## आर. टी. जिजांचे अपघाती निधन; पंकजा मुंडेंचे सगळे कार्यक्रम रद्द







बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील माजलगावचे माजी आमदार आर टी देशमुख यांच्या गाडीला लातूर– तुळजापूर रस्त्यावरील बेलकुंड येथे अपघात झाला आहे. या आपघातात जखमी झाल्यानंतर माजी आ. देशमुख यांचे उपचारादरम्यान लातूर येथे एका हॉस्पिटलमध्ये निधन झाले आहे. दरम्यान मंत्री पंकजा मुंडे यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द केले असून स्व. गोपीनाथ मुंडे यांचा सच्चा शिलेदार हरपल्याने बीड जिल्हा भाजपवर दुखाचा डोंगर कोसळला आहे.

राज्यातील अपघातांच्या घटना वाढ झाली असून रस्ते अपघाताचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांत सातत्याने अपघाताचे वृत्त माध्यमांत झळकत आहे. आता, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड उड्डाणपूल वरून जात असताना माजी आ. आर. टी. देशमुख यांची गाडी स्लिप होऊन सुरक्षा कठडा तोडून चारवेळेस पलटी झाल्याने भीषण अपघाताची घटना घडली.

### मंत्री पंकजा मुंडेंचे सर्व कार्यक्रम रद्द

दरम्यान राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत नांदेड येथील कार्यक्रमात असतानाच त्यांना ही माहिती कळाली. त्यानंतर तातडीने त्यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द करत नांदेडहून लातूरकडे प्रस्थान केले. आर. टी. देशमुख यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांनी धीर दिला. तसेच सह्याद्री हॉस्पिटलच्या डॉ. किनीकर यांच्याशीही संवाद साधून माहिती घेतली.

या अपघातात माजी आमदार आर.टी. देशमुख यांचे निधन झाले आहे, अपघातानंतर त्यांना पुढील उपचारासाठी लातूर येथे पाठवण्यात आले होते. लातूर येथील पान २ वर

### आपघाताचे खरे कारण?

ज्या वेळी आर. टी. देशमुख यांची गाडी बेलकुंड उड्डाणपुलावरुन जात होती. त्यावेळी रस्त्यावर पाणी साचले होते. त्यामुळे पाण्याचा व रस्त्याचा अंदाज न आल्याने चालकाचा ताबा सुटला असावा, असे म्हटले जात आहे. मात्र पोलिस प्रशासनाकडून याबाबत अधिकृत माहिती अजून तरी मिळाली नाही.

### जि.प. सदस्य ते आमदार

आर. टी. देशमुख हे सिरसाळा येथून जवळ असलेल्या कान्हापुर मोहा या गावचे भुमिपुत्र असून सुरुवातीपासून स्व. गोपीनाथ मुंडे यांचे निष्ठावंत म्हणून ते सर्वपरिचित होते. वैद्यनाथ कारखान्यावर ते कायम संचालक होते. तर जि. प. सदस्य ते भाजप जिल्हाध्यक्ष आणि पुढे माजलगाव मतदार संघाचे ते आमदारही झाले. स्व. मुंडे साहेबांनंतर मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांना एक खासगी साखर कारखाना सुध्दा दिला. जिवाभावाचा सच्चा शिलेदार म्हणून जिजांकडे पाहिले जात होते.

### बजरंग सोनवणेंकडून श्रद्धांजली

लातूर जिल्ह्यात घडलेल्या भीषण अपघातात माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख (जीजा) यांचे निधन झाले. जीजांच्या जाण्याने बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली, असे बजरंग सोनवणे यांनी म्हटलं आहे.

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आर टी जिजा देशमुख यांच्या निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास आपण मुकलो आहोत. त्यांच्या अकाली अपघाती निधनाने बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.
भावपूर्ण श्रद्धांजली
**–माजी मंत्री आ. धनंजय मुंडे**

आर. टी. जिजा आणि आमच्या कुटुंबाचा अनेक दशकांपासूनचा कौटुंबिक स्नेह आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचे सच्चे सहकारी आणि त्यांच्या पश्चात आमच्यासोबत भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते असा त्यांचा राजकीय प्रवास आमच्यासोबत राहिला आहे. आज जिजांचे अपघाती निधन झाल्याची बातमी ऐकली आणि मन सुन्न झाले. अनेक वर्षांचा त्यांचा राजकीय सहवास नजरेसमोर आला. आर. टी. जिजा यांच निधन आम्हा सर्वांसाठी धक्कादायक आणि अत्यंत दुःखद आहे. दुःखाच्या या कठीण प्रसंगात आम्ही देशमुख कुटुंबाच्या सोबत आहोत.
स्व.आर.टी. जिजा देशमुख यांना भावपुर्ण श्रद्धांजली !
**–माजी खा. प्रीतमताई मुंडे**

प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दुर्धर आजाराला जिजांनी हरवलेलं आपण सर्वांनी पाहिले.परंतु अपघाताने त्यांच त्यांचं निधन होईल याची कल्पना करवत नाही,ही बातमी वेदनादायी आहे.एकमेकांचे राजकीय विरोधक असताना राजकारणापलीकडे आम्ही मैत्रीपूर्ण संबंध कायम जपण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या जाण्याने निश्चित मोठी पोकळी निर्माण झाली,जी भरून निघणार नाही.
भावपूर्ण श्रद्धांजली !
**– आ.प्रकाश सोळंके**

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख (जिजा) यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. अतिशय शांत, मृदू स्वभावाच्या या नेत्याने राजकारणापलीकडे वैयक्तिक संबंध जोपासले. आर. टी. देशमुख यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी होणार आहे. हे दुःख पेलविण्याची शक्ती आई भवानी त्यांच्या परिवारास देवो...
भावपूर्ण श्रद्धांजली.
**–आ.विजयसिंह पंडित**

बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते, भाजपचे माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख उर्फ जिजा यांचे लातूरला जात असताना अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आणि धक्कादायक आहे. त्यांच्या जाण्याने एक सर्वसामान्य लोकांना आधार देणारे, सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांची जाण असणारे प्रभावी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. भाजपा जिल्हाध्यक्ष आणि आमदार म्हणून त्यांनी केलेलं काम सदैव स्मरणात राहिल. या दुःखद प्रसंगी देशमुख कुटुंबीयांच्या दुःखात माझ्यासह संपूर्ण भाजपा महाराष्ट्र परिवार सहभागी असून ईश्वर जिजा यांच्या आत्म्यास सद्गती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
भावपूर्ण श्रद्धांजली !
**–आ.सुरेश धस**

माजलगाव विधानसभेचे माजी आमदार आर.टी.देशमुख साहेब यांच्या अपघाती निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. गोरगरीबांचे आमदार म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ख्याती मिळवलेल्या देशमुख साहेबांचे सामाजिक व राजकीय योगदान अजरामर राहील. त्यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.
भावपूर्ण श्रद्धांजली
**–आ.नमिता मुंदडा**

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार, ज्येष्ठ नेते आर.टी. देशमुख (जिजा) यांचे अपघाती निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आणि धक्कादायक आहे. सामाजिक एकोपा आणि बीडच्या विकासासाठीचे त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. माझ्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांप्रती असलेला त्यांचा प्रेमळ व्यवहार हा कायम आठवणीत राहील! अत्यंत जड अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली !
भावपूर्ण श्रद्धांजली
**– रविकांत तुपकर, शेतकरी नेते**

लातूर जिल्ह्यात घडलेल्या भीषण अपघातात माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आदरणीय आर. टी. देशमुख (जिजा) यांचे दुःखद निधन झाले.ते जिजा या नावाने परिचित होते. स्व गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.
**–लक्ष्मण हाके, ओबीसी नेते**

# मुंबईत मे महिन्यात १०० वर्षातील सर्वाधिक पाऊस

## १९१८ नंतर पहिल्यांदाच वरूण राजा एवढा बरसला

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत यंदा मान्सूनने लवकर हजेरी लावून विक्रम केला आहे. २६ मे २०२५ रोजी मुंबई शहरात मान्सून दाखल झाला आणि हा दिवस मुंबईच्या इतिहासात सर्वात लवकर मान्सून आगमनाचा ठरला आहे. याआधी सन १९५६, १९६२ आणि १९७१ या वर्षांमध्ये २९ मे हा सर्वात लवकर मान्सून आगमनाचा दिवस नोंदवला गेला पान २ वर



# नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा

## मुख्यमंत्री फडणवीसांचे निर्देश, पावसाच्या परिस्थितीचा घेतला आढावा

मुंबई । प्रतिनिधी

**पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरित्या आढावा घेत आहेत. या परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. ज्या ठिकाणी नुकसान झाले तेथे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. राज्याच्या मुख्य सचिव आणि राज्याच्या आपत्ती निवारण कक्षाशी ते सातत्याने संपर्कात आहेत.**

राज्यातील या परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांना विविध यंत्रणांकडून अवगत करण्यात आले. राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई



आणि एमएमआर या भागात अतिवृष्टी झालेली आहे. दौंडमध्ये ११७ मि.मी., बारामतीत १०४.७५ मि.मी., इंदापुरात ६३.२५ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. फलटणमध्ये १६३.५ मि.मी. इतका पाऊस झाला. एनडीआरएफची एक चमू फलटणमध्ये आहे. सोलापूरमध्ये ६७.७५ मि.मी. पाऊस झाला. मुंबईत २४ तासात १३५.४ मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. मुंबईत एकूण ६ ठिकाणी पाणी साचण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. एकूण १८ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्याच्या तर ५ ठिकाणी इमारतीच्या भींती पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मुंबई महापालिका, अग्निशमन दल, मुंबई पोलिस आणि इतरही सर्व यंत्रणा सज्ज आहेत. कुठेही प्राणहानी झालेली नाही. मुंबईत ५ ठिकाणी एनडीआरएफ टीम कुठल्याही प्रकारच्या मदतीसाठी सज्ज आहेत. दरम्यान, मुंबईत पुढील २४ तास विजांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पान २ वर

cmyk

अग्रलेख

# टीम इंडियात विश्वासाची भावना तयार व्हावी !

देशातील अनेक राज्यांत सध्या भाजपची सत्ता असली, तरी भाजपला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांची सरकारेही काही राज्यांमध्ये आहेत. या राज्यांशी व्यवहार करत असताना केंद्र सरकार दुजाभाव करत असल्याचा आरोप नेहमीच या राज्यांकडून केला जातो. दुसरीकडे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी आणि चांगल्या योजनांना विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये महत्त्व दिले जात नाही. या योजनांचा फायदा तळागाळापर्यंत जाणीवपूर्वक पोहोचू दिला जात नाही अशा प्रकारचा आक्षेप केंद्र सरकारकडूनही घेतला जातो. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गेल्या काही कालावधीमध्ये जाणीवपूर्वक काही केंद्रीय योजना नाकारल्या आहेत. एव्हढेच नाही तर वक्फ कायद्याची अंमलबजावणी पश्चिम बंगालमध्ये करण्यासही त्यांनी विरोध दर्शवला आहे. तामिळनाडूसह काही दक्षिण भारतीय राज्यांमध्ये त्रिभाषा धोरणाला जोरदार विरोध झाला आणि हिंदी भाषा दक्षिणात्य राज्यांवर लादू नये यासाठी या राज्यांनी जोरदार आक्षेपही नोंदवला. जम्मू काश्मीर सारख्या राज्याला लागू असणारे कलम ३७० काढून घेतल्यानंतर तेथे राजकीय पक्ष अद्यापही नाराज आहेत. साहजिकच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीम इंडिया विकसित करण्याची जरी अपेक्षा व्यक्त केली असली, तरी राजकीय अपरिहार्यतेमुळे आणि एकमेकांना टोकाचा विरोध करण्याच्या धोरणामुळे ही टीम इंडिया प्रत्यक्ष कधी अस्तित्वात येईल याबद्दल शंका घेण्यास वाव आहे. पूर्वी सरकारिया या नावाच्या एका आयोगाने केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील संबंध कसे असावेत याबाबत काही मार्गदर्शक सूचना जरी तयार केल्या असल्या, तरी त्या सूचनांचा अनेक वेळा केंद्र सरकारलाही विसर पडतो.

राज्य सरकारही केंद्र सरकारला सहकार्य करण्याच्या मनस्थितीत नसतात. खरेतर मनात आणले तर अशा प्रकारची एक टीम इंडिया उभी राहणे अवघड गोष्ट नाही. ज्या प्रकारे पहलगामवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने पाकिस्तानला धडा शिकवण्याची भूमिका घेतली, त्यानंतर देशातील सर्वच राजकीय पक्ष केंद्र सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. या कारवाईबाबतची भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकारनेही सर्वपक्षीय खासदारांना परदेशात जाण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे अशा प्रकारे एखादी टीम इंडिया उभी राहण्यासाठी युद्धसदृश परिस्थितीचीच गरज आहे की काय अशी शंका आल्याशिवाय राहत नाही. आता पंतप्रधानांनी प्रथमच अशा प्रकारे टीम विकसित करण्याची गरज व्यक्त केली असल्यामुळे विरोधी पक्षाची सरकारे असलेल्या राज्यांनीही सहकार्याची भूमिका घ्यायला हरकत नाही. केंद्र सरकारनेही राज्यात कोणत्या पक्षाचे सरकार आहे याचा विचार न करता त्या राज्याच्या पाठीशी उभे राहणेही गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंधांमध्ये बाधा आणणारा जो निधीचा वाटप हा एक विषय असतो त्या विषयाला पूर्णविराम देण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलण्याची गरज आहे. कर महसुलातील वाटा असो किंवा इतर कोणत्या प्रकारची आर्थिक मदत असो, निर्णय घेताना कोणताही दुजाभाव केला जाऊ नये अशी जर राज्य सरकारांची अपेक्षा असेल, तर ती पूर्ण करण्याची जबाबदारी केंद्र सरकारला घ्यावी लागेल. निवडणुकीच्या राजकारणात यशस्वी होण्यासाठी राजकीय पक्षांना पक्षीय धोरणाचा पाठपुरावा जरी करावा लागत असला, तरी देशाच्या हिताचा विचार करून पक्षीय धोरणे थोडीशी बाजूला ठेवून टीम इंडिया म्हणून जगासमोर येण्यास काहीच हरकत नसावी. महत्त्वाची गोष्ट म्हणजे निती आयोगाच्या बैठकीमध्ये पंतप्रधान मोदी यांनी टीम इंडिया विकसित करण्याबाबत अपेक्षा व्यक्त केली असल्यामुळे पंतप्रधान ज्या केंद्र सरकारचे नेतृत्व करतात त्या केंद्र सरकारकडूनच प्रथम सकारात्मक पावले उचलली जाण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक राज्याची सांस्कृतिक ओळख वेगळी आहे. तेथील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीही वेगळी आहे. त्याचा विचार करूनच सरकारला सर्वच राज्य सरकारांमध्ये विश्वासाची भावना निर्माण व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. काश्मीर खोऱ्यातील दहशतवादाची परिस्थिती असो किंवा ईशान्य भारतातील काही राज्यांमधील असंतोष असो किंवा काही राज्यांमधील नक्षलवादासारखा विषय असो, हे सर्व विषय संपवायचे असतील तर सर्वांनी एकत्र येऊनच काम करणे गरजेचे आहे यात शंका घेण्याचे कारण नाही. क्रिकेट खेळणाऱ्या टीम इंडियाला एखाद्या सामन्यातील पराभवानंतर पुढील सामन्यात आपल्या चुका सुधारण्याची संधी मिळते. पण तशा प्रकारची संधी केंद्र सरकार आणि राज्य सरकार पातळीवर काम करणाऱ्या टीम इंडियाला मिळेलच असे नाही. म्हणूनच कोणत्याही गंभीर चुका होणार नाहीत किंवा कोणीही दुखावला जाणार नाही आणि देश हिताला बाधा पोहोचणार नाही या मूलभूत गोष्टींचा विचार करूनच मोदी यांना अपेक्षित असलेल्या टीम इंडियाची बांधणी करावी लागणार आहे.

## आडत व्यापाऱ्यांना गंडवीणारा महाठग, बालाजी कोयले माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात; योगेश हांडे फरार




माजलगाव । प्रतिनिधी

**माजलगावसह नागपूर, बिलोली, धाराशिव, लातूर, कर्नाटक येथील यादगीर व महाराष्ट्र राज्यातील अनेक आडत व्यापारी यांना बनावट व्यापारी –ब्रोकर्स बनून करोडो रुपयांना चुना लावलेला महाठक बालाजी कोयले अथक प्रयत्ननंतर माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात अडकला आहे. त्याला माजलगाव न्यायालया ने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.त्याचा सहकारी योगेश हांडे आजही फरार आहे.**

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.७६/२०२४ या गुन्हयामध्ये आरोपी नामे बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यां दोघांनी फिर्यादी विष्णुदास भिकुलाल भुतडा, वय४०: माजलगाव यांना ३२ लाख रु ला गण्डवले होते.भूतडा यांच्या माजलगाव येथील शिवम ट्रेडींग कंपनी या आडत दुकानमध्ये दिनांक २७/०२/२०२४ रोजी तुर चना विक्रीसाठी आहे का असे म्हणून लातुर येथील गोपाल कॅन्ड्रॉसिंग च्या बनवट नावाखाली बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे त्यांनी चना माल एकूण १२१ क्वींटल ५० किलो त्याची एकूण किंमत ७,४२,०००/– व तुर माल २५ टन ज्याची किंमत २५,३७,५६५/– असे घेवून सदर माल हा माहेश्वरी पल्सेस दाल मिल लातुर या ठिकाणी दयावयाचा असल्याचे सांगून त्या नावाने सदरील दोन्ही मिळुन बिलाची एकूण रक्कम रु.३२,७९,७६५/– रुपये या नावाने बिल करून सदर बिलाची रक्कम आर.टी.जी.एस. व्दारे देतो असे म्हणुन सदरील माल ट्रक क्रमांक एम एच ४० सी.एम.४५९० या ट्रकने नेवून त्यांनी परस्पर विक्री करून फसवणुक केली होती. फिर्यादीनुसार बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यांच्या विरुध्द कलम ४२०,४०६ व ३४ नुसार गुन्हा रं.नं.७६/२०२४ हा दाखल झालेला होता. या गुन्ह्यात तबल सव्वा वर्षानंतर यश आले असून यातील मुख्य आरोपी बालाजी कोयले पोलिसाच्या ताब्यात आहे. त्याने यादगीर कर्नाटक येथील व्यापाऱ्यास दोन कोटींचा, बिलोली येथील व्यापाऱ्यास १८ लाखास, माजलगाव येथील कोल्हे या व्यपाऱ्यास १२ लाख तर लातूरला एम आय डी सी पोलीस ठाण्यात दरोडा व फसवूक या गुन्ह्यात हा आरोपी आहे. माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, उपनिरीक्षक सतीश दिंडे यांनी यास अटक केली असून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

## दिवाळीपर्यंत ७५ हजार घरांच्या स्वप्नपूर्तीसाठीचे नियोजन; ३३,६४८ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे वाटप



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सन २०१६-१७ ते २१-२२ या वर्षात एकूण ३४,२३९ घरकुलापैकी ३१३२ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे एकूण ९१.५४ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यात सन २०२४- २५ मध्ये एकूण ८०, ३३३ दिवाळीपर्यंत ७५, ५०५ घरकुले पूर्ण करण्यात येणार असल्याची घोषणा नुकतीच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांनी केली. त्या दृष्टीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत मराठवाड्यात बीड जिल्हा अव्वलस्थानी आहे.



जिल्ह्यात तालुकानिहाय उद्दिष्ट पुढील प्रमाणे देण्यात आले आहे. अंबाजोगाई ७,२२५, आष्टी ९,५९७, बीड १२,५४१, धारूर ४,९७९, गेवराई १२,३२७, केज ९, २०४, माजलगाव ७,३०२, परळी ६,२१३, पाटोदा ४२५६, शिरूर (कासार) ३,९३३, वडवणी २,७५६ एकूण ८०,३३३, उद्दिष्ट आहे. आतापर्यंत ३३,६४८ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याची वाटप करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील आणि त्यांचे सहकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उद्दिष्ट पूर्तीसाठीचे नियोजन केले आहे.

**सीईओ साहेब, बीडीओंना कामाला लावा**

तालुकास्तरावर घरकुलाचे उद्दिष्ट प्रदेशासाठी गटविकास अधिकारी यांनी, सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्फत प्रामाणिक प्रयत्न केल्यासच विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होईल, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बीडीओंना कामाला लावणे गरजेचे आहे, अशी ही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे.

## श्री स्वामी समर्थ बचत गटाची वाटचाल अत्यंत उत्तमरीत्या सुरू असून सभासदांनी बचतीमध्ये आणखी वाढ केल्यास आपल्या स्वप्नातील घर तयार होण्यास वेळ लागणार नाही-मनोज लखेरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**श्री स्वामी समर्थ बचत गटाची वाटचाल अत्यंत उत्तमरीत्या सुरू असून बचत गटाच्या सभासदांनी आपल्या बचतीमध्ये आणखी वाढ केल्यास आपल्या स्वप्नातील घर तयार होण्यास काहीही वेळ लागणार नाही असे उद्गार ज्येष्ठ मार्गदर्शक मनोज भाऊ लखेरा यांनी काढले.आंबेजोगाई शहरात ५० महिला व पुरुषांनी एकत्रित येऊन एका विशिष्ट ध्येयाने निर्माण केलेल्या श्री स्वामी समर्थ बचत गटाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोज लखेरा हे बोलत होते. यावेळी सीसीसी बँकेची नवनिर्वाचित संचालक दिलीप लव्हारे, माजी सैनिक गोपीनाथराव काळे, ज्येष्ठ सदस्य पूनमचंद परिषद परदेशी, संजना राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी पुढे बोलताना बचत गटाचे मार्गदर्शक मनोज लखेरा म्हणाले कि, बचत गटाची वाटचाल अतिशय उत्तमरीत्या सुरू असून आपण मासिक रित्या जमा करत असलेल्या हप्त्यांमधून बचत गटाची आर्थिक उन्नती होणे ही कठीण बाब आहे त्यासाठी बचत गटाच्या सदस्यांनी एक रकमी एक लाख रुपये बचत गटाकडे जमा केले तर मोठा निधी बचत गटाकडे जमा होईल. यामुळे आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सोयीचे होण्यास मदत होणार असून या माध्यमातून जमा झालेला सर्व पैसा रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक केल्यास निश्चित बचत गटाला बळ मिळणार आहे व त्यानंतरच खऱ्या अर्थाने बचत गटाची ध्येयपूर्ती झाल्याशिवाय राहणार नाही. अध्यक्ष समारोपात बोलताना बचत गटाचे अध्यक्ष नरसिंग साबणे यांनी १५ ऑगस्ट पर्यंत प्रत्येक सदस्यांनी एक लाख रुपये बचत गटाकडे जमा करावे व ज्यांना हे भरणे



शक्य नाही त्यांना हा गट सोडावा लागणार असून त्यांच्या जागी नवीन सदस्याची भरती करण्यात येईल. जेणेकरून बचत गटाचा उद्देश साध्य करण्यासाठी विलंब लागणार नाही असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन करताना बचत गटाचे सचिव दत्तात्रय आंबेकर यांनी मागील वर्षाचा आढावा सादर करून बचत गट कशा पद्धतीने यशस्वी रित्या वाटचाल करत आहे याविषयी सविस्तर मांडणी केली. या वेळी त्यांनी आगामी काळात बचत गटाच्या आर्थिक उन्नतीसाठी काय योजना राबवता येतील याविषयी प्रारूप आराखडा सादर करत त्यांनी आपले मार्गदर्शक मनोज लखेरा यांच्यामुळे बचत गटाला निश्चित बळ मिळणार असून आपली संकल्पना पूर्णत्वास जाणार आहे असे मत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सीसीसी बँकेवर निवड झालेले वाहक दिलीप लव्हारे यांचा सत्कार करण्यात आला या सभेत सभासदांनी १५ ऑगस्ट पर्यंत प्रत्येकी १ लाख रु जमा करण्याचा आणि ऑगस्ट महिन्या पासून दरमहा दीड हजार हप्ता रुपये करण्याचा सर्वानुमते ठराव घेण्यात आला. यावेळी कोषाध्यक्ष संतोष वाघाळकर, परमेश्वर गीते, गणेश मसने, भागवत सेलूकर, संजय रानभरे, अशोक दळवे, राहुल देशपांडे, आत्माराम कदम, शामल आंबेकर, दिपाली गीत्ते, सरस्वती काळे, सज्जला राऊत, शामल पांचाळ, गजेंद्र आपेट, व्यंकटेश जोशी, अशोक थोरात दिलीप मारवाळ, तुळशीराम मारवाळ, विनोद जाधव, राजकुमार कुडके, निलेश जोगदंड आदी सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर गीते तर आभार प्रदर्शन राहुल देशपांडे यांनी मानले.

## गंभीर मारहाणीच्या गुन्ह्यातून शिवाजी बनसोडे यांची निर्दोष मुक्तता

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कानडी खूर्द येथील घटनेची हकीकत दि २ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास कानडी खुर्द येथील महिला रखमा नामदेव बनसोडे व फिर्यादी अशोक बनसोडे राहणार कानडे खुर्द हे जात असताना इसम नामे शिवाजी बबन बनसोडे हा फिर्यादीची पत्नी शुभांगी बनसोडे हिच्या जवळ आला व शेतात जायचे नाही असे म्हणाला व त्याने उजव्या हाताचे करंगळीचे बोटाचा चावा घेऊन लाथा बुक्याने मारहाण केल्याची व त्याची चुलती नामे अरुणा न्यानेश्वर बनसोडे हीच लाकडी काठीने मारहाण केली व तिच्या उजव्या हाताचे मनगटाला मुका मार दिला व जीवे मारण्याची धमकी दिली व सर्वांनी उपचार घेतले असे आशयाची तक्रार अंभोरा पोलिसात दिली तपासी अंमलदार यांनी तपास करून दोषारोप पत्र मे. कोर्टात दाखल केले प्रकरणात आरोपीविरुद्ध वेगवेगळे सहा गंभीर स्वरूपाची भारतीय दंडविधान संहिता ची वेगवेगळे कलमे लावली व न्यायालयात साक्षी पुरावा होऊन सात साक्षीदारांची जबाब न्यायालयात झाले त्यामध्ये गावातील समद पठाण घटनास्थळ पंच व डॉ शुभांगी पैठणे तसेच तपाशी अंमलदार तथा एपीआय अजिनाथ भडके तसेचअशोक बबन बनसोडे आदी सात लोकांची साक्ष मा. न्यायालयात नोंदविण्यात आली वरील साक्षीदाराची साक्ष विश्वास पात्र वाटली नाही. आरोपीचे विद्वान फौजदारी वकील ॲड राकेश हंबर्डे यांनी न्यायालयात भक्कमपणे निर्भीडपणे साक्षीदारांचे उलट तपास व त्यानंतर अंतिम विवेचन केले व न्यायालयात प्रस्तुत खटला फिर्यादीने सबळ पुराव्याने सिद्ध केला नाही तसेच जखमी महिला अरुणा हिने तिला मारहाण झाले बाबत व उपचार घेतले बाबत न्यायालयास कळविले नाही तसेच आजूबाजूचे शेतकऱ्यांची जबाब नोंदविले नाही याउलट प्रकरणातील आरोपी याने फिर्यादी व इतर तीन साक्षिदार यांचे विरुद्ध कथित घटनेच्या अगोदर त्याच्या पत्नीचा मारहाण करून गर्भपात केले बाबत तक्रार दिली आहे व त्यास देखील नाकाचे हाड फ्रॅक्चर होईपर्यंत मारहाण झाल्याचे मे. कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले आहे त्यामुळे आरोपीचे विधीज्ञ ॲड राकेश हंबर्डे व त्यांना सहकार्य करणारे ॲड महादेव मोहिते यांनी उच्च न्यायालयाचे तसेच सर्वोच्च न्यायालयाचे वेगवेगळे न्यायनिवाडे कळवून संशयाचा फायदा आरोपीस मिळवून दिला त्यामुळे आरोपीची सदर प्रकरणातून निर्दोष मुक्तता झाली. दि ९ में २०२५ रोजी मा.न्यायाधीक्ष एम के पाटील यांनी न्यायनिर्णय दिला.विशेषता सदरचा गुन्हा नोंदविला म्हणून आरोपींनी तहसील कार्यालय आष्टी येथे कुटुंबियांसह आमरण उपोषण केले होते. आरोपीची निर्दोष मुक्तता झाल्यामुळे कानडी खुर्द व पंचक्रोशीतील लोकांनी दोन्हीही विधीज्ञानाचे ॲड राकेश हंबर्डे व ॲड महादेव मोहिते यांचे प्रत्यक्ष पेढा भरून आभार मानले सदर प्रकरणाकडे कानडी खुर्द व पंचक्रोशीतील लोकांचे लक्ष लागले होते शेवटी सत्याचा विजय झालाच अशी जनमानसात चर्चा होती.






## पान १ वरून...

### वापसा येत नाही

मान्सून न महाराष्ट्रातील काही भाग व्यापला असून मुंबईसह पुणे आणि सोलापुरातही नैऋत्य मोसमी पाऊस दाखल झाला आहे. पुढील तीन दिवसात महाराष्ट्रातील आणखी काही भाग मान्सून व्यापणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली.

-------------

### मुंडे साहेबांचा सच्चा

सह्याद्री हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच मंत्री पंकजा मुंडे तत्काळ आपले कार्यक्रम रद्द करुन लातूरला रवाना झाल्या. तर आर. टी. देशमुख हे स्व. गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक होते. अडचणीच्या काळात सुध्दा मुंडे साहेबांना देशमुख यांनी खंबीर साथ दिलेली आहे. कार आपघातात देशमुख यांचे निधन झाल्याने मुंडे साहेबांचा सच्चा शिलेदार हरपल्याने बीड जिल्हा भाजपवर दुखाचा डोंगर कोसळला आहे. आरटी देशमुख यांच्यावर परळी येथे दि.२८ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत..

-------------

### नुकसानीचे तात्काळ

पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिव तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध यंत्रणांना सतर्क आणि सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. एनडीआरएफ – एसडीआरएफ, अग्निशमन, महसूल प्रशासन तसेच गृह विभाग आदींना नियंत्रण कक्षांच्या माध्यमातून तातडीच्या उपाययोजना आणि मदत व बचावासाठीची सज्जता ठेवण्याच्या अनुषंगानेही त्यांनी विविध सूचना केल्या. जलसंपदा विभागाशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत.

-----------

### मुंबईत मे महिन्यात १००

होता. मात्र यंदा हा विक्रम मोडीत निघाला आहे. विशेष म्हणजे या जोरदार पावसामुळे भारतीय हवामान विभागाने सकाळी दिलेला 'ऑरेंज' अलर्ट दुपारी १२.३८ वाजता 'रेड' अलर्टमध्ये रूपांतरित केला. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी हे इशारे देण्यात आले आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आयएमडीच्या कुलाबा वेधशाळेने २४ तासांत (सोमवार सकाळी ८.३० पर्यंत) १३५.४ मिमी पावसाची नोंद केली, ज्याला ''खूप जास्त पाऊस'' म्हणून वर्गीकृत केले जाते. याउलट, सांताक्रूझ वेधशाळेने केवळ ३३.५ मिमी पाऊस नोंदवला. कुलाबा वेधशाळेने मे महिन्यातील सर्वाधिक पावसाचा विक्रमही मोडला आहे. आतापर्यंत या महिन्यात २९५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. याआधीचा विक्रम १९१८ मध्ये २७९.४ मिमी इतका होता. २०२१ मध्ये आलेल्या तौक्ते चक्रीवादळादरम्यान पडलेला पाऊस देखील याहून कमी (२५७.८ मिमी) होता. मुंबई शहरात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. ब्रीच कँडी, केम्प्स कॉर्नर, सायन सर्कल, दादर टीटी, हिंदमाता, जेजे मार्ग पोस्ट ऑफिस, कुरणे चौक, बिंदू माधव जंक्शन (वरळी) आणि फाईव्ह गार्डन्स येथे पाणी साचल्याची माहिती आहे. यामुळे झाडे/फांद्या पडण्याच्या ९ घटना नोंद झाल्या आहेत. यातील शहरात ४, पश्चिम उपनगरात ५ घटना आहेत. केम्प्स कॉर्नर येथे रस्ता खचल्यासारखा झाला होता. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार पाण्याच्या दाबामुळे डांबर उखडून वर आले होता. येथे दुरुस्तीचे काम तत्काळ हाती घेण्यात आले.

-----------

## मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव; उपस्थित राहण्याचे संयोजन समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारूर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे.असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

# तांदळा उपोषणात गावोगावच्या शेतकऱ्यांचा सहभाग

## डॉक्टरांनी केली तपासणी, मंडळधिकाऱ्यांची उपोषणस्थळी भेट

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तांदळा येथे जायकवाडीचे पाणी सोडावे यासह इतर अनेक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू आहे. या उपोषणास गावोगावचे शेतकरी भेट देऊन सहभाग घेत आहेत. सोमवारी उपोषण करते अजय पाटील साळुंखे यांची प्राथमिक आरोग्य केंद्र मादळहोमी येथील डॉक्टरांनी भेट घेऊन तपासणी केली. तर मंडळधिकारी डि.डि. शेंबडे व तलाठी नामदेव पाखरे यांनी उपोषणस्थळी भेट दिली.

बीड जिल्ह्यातील शिरूर गेवराई बीड माजलगाव वडवणी या तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतीला बारमाही पाणी मिळत नाही. जायकवाडी धरण अत्यंत जवळ असूनही अद्यापही या धरणाचे पाणी या वंचित भागाला मिळालेले नाही. शिरूर ते माजलगाव या भागातील शेतकऱ्यांना जायकवाडीचे पाणी मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून लोकलढा आंदोलन चालू आहे. याच आंदोलना अंतर्गत दुसरा टप्पा म्हणून तांदळा येथे अजय पाटील साळुंखे यांनी रविवारपासून उपोषण सुरू केले आहे. सोमवारी या उपोषणाला कोळगाव ,साक्षाळ पिंपरी, शेकटा, मादळमोही, कुकडगाव, मातोरी, सिरसमार्ग, पोखरी, तालखेड यासह इतर ठिकाणच्या तरुण व ज्येष्ठ शेतकऱ्यांनी भेट देत उपोषणात सहभाग घेतला.

जायकवाडी धरणाची अथवा कृष्णा




खोऱ्यातील पाणी मिळावी यासाठी गेल्या एक वर्षापासून लोक लढा आंदोलन सुरू आहे. मात्र अद्यापही या शेतकऱ्यांची शासनाकडून मानावी तशी दखल घेतली जात नसल्याने शिरूर ते माजलगाव दरम्यानच्या शेतकऱ्यांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासनाला वारंवार मागणी करूनही धरणाचे पाणी दिले जात नसल्याने शिरूर ते माजलगाव दरम्यानची शेती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे, याचे परिणाम शेती व शेतकऱ्यांवर होत आहे. या भागात बारमाही बागायत शेती नसल्याने शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांच्या मुलांचे विवाह, शिक्षण, बेरोजगारी असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे. सोडवण्यासाठी येथील शेती बारमाही पाण्याखाली आली पाहिजे या विचाराने जात, धर्म, पंथ, पक्ष, कुठलीही संघटना याचा विचार न करता १४० गावातील शेतकरी एकत्र आले असून त्यांनी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा आता तांदळा येथे सुरू झाला असून गावचे शेतकरी या आंदोलनास भेट देऊन सहभाग घेत असल्याचे दिसून येत आहे. सोमवारी दुपारी मादळमोही प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या पथकाने भेट देत तपासणी केली.

### कीर्तनातून लोकजागृती

या लोकलढा आंदोलनाची माहिती सर्व शेतकऱ्यांना व्हावी यासाठी तांदळा ग्रामस्थ व युवा सरपंच नवनाथ गवते, पत्रकार संतोष भारती, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल लोंढे, समन्वयक दिनेश गुळवे, मच्छिंद्र मामा गावडे यांनी आंदोलन स्थळी दररोज रात्री कीर्तनाचे आयोजन केले आहे. रविवारी रात्री अमोल महाराज डोंगरे यांची कीर्तन झाली. आपल्या भागासह मराठवाड्याला विकासासाठी शेतीला पाण्याची तीव्र गरज असल्याची प्रतिपादन यावेळी डोंगरे महाराज यांनी केले. शेती व शेतकरी जगविण्यासाठी आपल्या शेतीला जायकवाडी अथवा कृष्णा खोऱ्याचे पाणी मिळाले पाहिजे अशीही आग्रही मागणी त्यांनी केली.

## बीड शहरात रिपाइंच्या वतीने दि. ३० मे ला भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन:पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना




अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. बीड शहरात जिल्हा रिपाइंच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी यांच्यासह रिपाइं कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोंच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी असे आवाहन यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

## संपादक गावरस्कर आण्णांचा, बुधवारी गौरव सोहळा

बीड । प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरस्कर यांना अखिल भारतीय





मराठी पत्रकार परिषदेचा नागोराव दुधगावकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्याबद्दल बीड येथील पत्रकार मित्र मंडळींच्या वतीने गौरव सोहळा बुधवार २८ मे रोजी १२.३० वाजता पत्रकार भावन येथे आयोजित केला आहे.

यापूर्वीचा हा पुरस्कार बीड येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख आप्पा यांना देण्यात आला होता, यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि मान्यवरांच्या उपस्थितीत अलिबाग येथील सोहळ्यात बीडचा मोठा सहभाग राहिला होता. यावर्षी मधुकर भावे यांच्या जीवनगौरव पुरस्कार सन्मानासोबतच बीड येथील संपादक गावरस्कर आण्णा यांना नागोराव दुधगावकर पुरस्कार घोषित झाला असून मुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच मुख्य गौरव सोहळा मुंबईत संपन्न होणार आहे. यानिमित्ताने बीड येथील पत्रकार मित्र मंडळी च्या वतीने आण्णांचा सन्मान ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी सोलापूर आणि अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या उपस्थितीत बुधवारी होत आहे. बीडच्या पत्रकारितेच्या या सन्मान सोहळ्यास, संपादक , पत्रकार, माध्यम क्षेत्रातील मित्रांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## बोरीपिंपळगावच्या माजी उप सरपंचास गेवराईत मारहाण

### स्विफ्ट गाडी फोडली फिल्मी स्टाईलने अपहरण करण्याचा प्रयत्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बोरीपिंपळगाव येथिल माजी उप सरपंच आपल्या खाजगी कामानिमित्त गेवराईला आले असता त्यांना काही आज्ञाताकडून जबर मारहान झाली असल्याची घटना घडली असून असुन मारेकरी यांनी त्यांची स्विफ्ट डिजायर गाडी देखील फोडली व त्यांचा अपहरण करण्याचा प्रयत्न केला आहे सदरची घटनेमुळे गेवराई शहरात खळबळ माजली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,तालुक्यातील बोरीपिंपळगाव गाव याठिकाणचे माजी उप सरपंच गणेश वडगणे हे गेवराई शहरात आपल्या खाजगी कामानिमित्त आले होते तसेच त्यांच्यावर सरकारी दवाखाण्यासमोर हल्ला चढवून जबर मारहान केली आहे तसेच ही हानामारी फिल्मी स्टाईलने करण्यात आली तसेच यामध्ये हातावर पायावर जबर ईजा झाली आहे ऐवढ्यावरच न थांबता त्याचे अपहरण देखील करण्याचा प्रयत्न मारेकरी यांनी केला होता तसेच ही घटना वाळूच्या तस्करीतून झाली असल्याचे बोलले जात असून त्यांना तात्काळ गेवराईच्या उपजिल्हा रूग्णलयात दाखल केले असता त्यांना जबर मारहान असल्या कारणाने पुढील उपचारासाठी बीड याठिकाणी हलवण्यात आले आहे तसेच या घटनेमुळे गेवराई शहरात मोठी खळबळ उडाली असून कायदा व सुवैस्था यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## कीर्तीनगर येथील तुंबलेल्या नाल्यामुळे अस्वच्छतेचा कहर ; स्वच्छता, वीजेच्या प्रश्नांसह नागरिकांना मूलभूत सुविधा द्या– श्रीनिवास राऊत

परळी वै.। प्रतिनिधी

**प्रभाग क्र ५ मधील कीर्ती नगर येथील नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाली तुंबलेली, पावसाळा पूर्व कामे अपूर्ण कामे अर्धवट खडे, खोदून ठेवल्यामूळे अपघात प्रमाण वाढले आहे. दिवस व रात्री नागरिक लहान मुलं वृद्ध व्यक्ती आणि जनावरे खड्यात पडली. मिलिंद कॉलेजच्या मागील रोड वर वीजचे पोल नसल्यामुळे रात्री अपरात्री चोरीचे आणि लूटमारूचे प्रमाण वाढले. त्यामुळे या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास राऊत यांनी दिला आहे.**

परळी शहराच्या स्वच्छतेसाठी नगर परिषदेने वर्षाकाठी कोटीची उड्डाणे घेतली असली तरी शहरातील स्वच्छतेची स्थिती केविलवाणी आहे. नगरपालिका स्वछता विभागाच्या ढिसाळ नियोजना मुळे सर्वत्र तुंबलेल्या नाल्या मुळे शहरात सर्वत्र अस्वछता व दुर्गंधी ने उच्छाद मांडला. अस्वछतेचा उच्छाद मांडला असून शहरातील सर्वच भागात तुंबलेल्या नाल्या व दुर्गंधी मुळे नागरिक त्रस्त झाले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आता पावसाळा जवळ आलेला असतांना मान्सूनपूर्व स्वच्छतेची कोणतीच कामे शहरात केलेली नसतांना किमान दैनंदिन नाल्या व रस्ते साफसफाई तरी निगरगट्ट नगरपालिका प्रशासनाने वेळेवर करून नागरिकांना अस्वछता व दुर्गंधी पासून दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील छोट्या मोठ्या नाल्यांची मान्सूनपूर्व नालेसफाई केली जाते. यावर्षी पाऊसकाळ चांगला असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पाऊस झाल्यास नाले सफाई न केल्यामुळे घर दुकानात पाणी घुसून नागरिकांचे व व्यावसायिकांचे वित्तीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे साफसफाई करावी तसेच प्रभाग क्र ५ मधील कीर्ती नगर येथील नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाली तुंबलेली अर्धवट खडे, खोदून ठेवल्यामूळे अपघात प्रमाण वाढले आहे. दिवस व रात्री नागरिक लहान मुलं वृद्ध व्यक्ती आणि जनावरे खड्यात पडली. वीजचे पोल नसल्यामुळे रात्री अपरात्री चोरीचे आणि लूटमारूचे प्रमाण वाढले. त्यामुळे या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास राऊत यांनी दिला आहे.

## विजेच्या प्रश्नावर आ. खोतकर आक्रमक

### महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठकीत केली झाडाझडती

जालना । प्रतिनिधी

जालना शहरासह ग्रामीण भागात विजेची समस्या गंभीर बनली असून या संदर्भात असंख्य नागरिकांच्या तक्रारी आमदार खोतकर यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन आमदार खोतकर यांनी थेट महावितरण कार्यालय गाठले व अधीक्षक अभियंता कार्यालयामध्ये सबंधीत सर्व महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले व जालना शहरासह जिल्हाभरातील वीज पुरवठा तातडीने सुरळीत करा व जनतेला विजेच्या समस्यापासून त्रास होणार नाही याची काळजी घ्या अशा स्वरूपाच्या सूचना उपस्थित महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. व अधिकाऱ्यांची चांगली झाडाझडती



घेतली. आमदार खोतकर यांनी अधिकाऱ्यांवर एक प्रकारे विजेच्या समस्या संदर्भात प्रश्नांची चांगली सरबत्ती केली .त्यामुळे अधिकाऱ्यांची भांबेरी ऊडली. पुढे बोलताना खोतकर म्हणाले की शहरास ग्रामीण भागामध्ये विजेच्या तारा लोंबकळलेल्या आहेत वारंवार दुरुस्ती करून देखील विजेची समस्या का सुटत नाही ?वारंवारित पुरवठा खंडित होण्याची कारणे काय? त्यावर तातडीने उपाययोजना का होत नाहीत ?निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या एजन्सीला काळ्या यादी का टाकले जात नाही,,? मर्जीतल्या लोकांनाच कामे दिले जातात. या संदर्भात जॉब विचारला .असे बोगस काम करणाऱ्या एजन्सीला काळ्या यादी टाका व त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करा.अनेक ठिकाणी उघड्यावर रोहित्रे दिसतात त्यामुळे अपघात होतात. ज्या भागात महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा होतो त्याच भागात वीज खंडित होण्याचे प्रमाण देखील शहरांमध्ये आढळून येते. याकडे देखील लक्ष वेधले आहे जालना शहरात अनेक ठिकाणी रहदारीच्या मार्गावरच विजेची खांबे आहेत वारंवार सूचना करूनही हटविले जात नाहीत. यामुळे अपघात होतात या संदर्भात तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देखील आमदार खोतकर यांनी केल्या. तसेच वीजबिला संदर्भात अनेक तक्रारी असून आवाची सव्वा बिले ग्राहकांना दिले जातात, तक्रार करून देखील वेळेवर वीज बिलाची दुरुस्ती होत नाही त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागते. यामध्ये तातडीने सुसूत्रता आणावी दिरंगाई व काम चुकवेगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी वरील सर्व उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात व वीजपुरवठा सुरळीत करावा. जनतेला होणारा त्रास कमी करा अन्यथा तुमच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व अधिकाऱ्यांची शासनाकडे तक्रार केली जाईल असा सज्जड दम ही उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना आमदार खोतकर यांनी दिला. या बैठकीस जिल्हा संपर्क नेते पंडितराव भुतेकर , जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले गणेश मोहिते युवासेना उपजिल्हाप्रमुख वसंत राजे जाधव ज्येष्ठ शिवसैनिक यांच्यासह अधीक्षक अभियंता संजय सरग, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता अधिकार, शाखा अभियंता संजय गहाणे ,शाखा अभियंता नागरे, व महावितरण चे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पात्र घरकुलधारकांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू मोफत देण्यात येणार –आ.नारायण कुचे

अंबड । प्रतिनिधी

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ अन्वये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यातील पात्र घरकुलधारकांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे अशी माहिती २६मे रोजी अंबड तहशील कार्यालयामध्ये बदनापूर अंबड मतदार संघाचे आमदार नारायण कुचे यांनी बैठकीमध्ये माहिती दिली. या बैठकीमध्ये तहसीलदार विजय चव्हाण अंबड नगरपरिषद चे मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थिती होती. यावेळी बोलताना श्री आमदार नारायण कुचे



म्हणाले की,

पात्र लाभार्थी यांनी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत किंवा स्वतःही स्वतःचा आधार क्रमांक मोबाईल क्रमांक व घरकुल मंजुरीची यादी चा क्रमांक अपलोड केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना तहसीलमार्फत मोफत ई पास देण्यात येणार आहे आणि त्यांनी त्यांना असलेल्या नजीकच्या वाळूघाटापासून पसंती क्रमांक दिल्यास त्या वाळू घाटावरून त्यांची ओळख पटवून त्यांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.अंबड तालुक्यात जवळपास पंधरा हजार पाचशे लाभार्थी असून त्यांच्या याद्या गावनिहाय तलाठी, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना देण्यात आलेले आहेत.त्याचबरोबर त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्याकरता गटविकास अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवक यांना सांगण्यात आलेले आहे. तलाठी, मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरता चे सर्व माहिती इत्यंभूतपणे देण्यात आलेली आहे. सदर योजना ही १० जून २०२५ पर्यंत असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले वाहन व भरण्याकरता साहित्य घेऊन मंजुरी झाल्यानंतर रेती उपलब्ध करून घ्यायची आहे. सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा याविषयी आवाहन करण्यात येते. त्याचबरोबर शासकीय यंत्रणांना शासकीय कामांना रेतीची मागणी झाल्या नुसार बारा हजार आठशे ब्रास रेती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.अंबड तालुक्यातील १० रेती घाटावरून सदरची रेती उपलब्ध करून देण्यात येणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भ अन्वये माननीय नारायण कुचे विधानसभा सदस्य बदनापूर यांनी उपस्थिती लावून उपरोक्त शासन निर्णयानुसार पात्र घरकुलधारकांना मोफत पाच प्रास रेती देण्यात येणार असून सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले.त्याचबरोबर उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी तथा सरपंच यांना सुद्धा सविस्तर मार्गदर्शन केले

सदर वेळी तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी उदय राजपूत, मुख्याधिकारी उकिरडे मनोज, नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दगुला व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते


## पान ६ वरून...


### कृषी सहाय्यकांच्या धरणे

छत्रपती संभाजीनगर येथे कृषी सहायकांनी पुकारलेल्या बेमुदत धरणे आंदोलनातून कृषी पदाधिकारी युवाशक्तीचे संस्थापक प्रवीण आजबे यांनी आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क साधून मागण्या सांगितल्या त्या क्षणी आ.सुरेश आण्णा धस यांनी राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांच्याशी मिटींग लावून मागण्या संदर्भात सविस्तर चर्चा करू आणि आपले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतो असे आश्वासन दिले.

### श्रीसावित्री सोलार कंपनीकडून

बोरवेलमध्ये सोडण्यात आले. कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतात पंप सुरू करून देण्याची हमी असताना देखील कंपनीने पंप सुरू करून न देताच पळ काढला आहे. शेतकरी कंपनीकडे वारंवार तक्रार करीत असले तरी कंपनी शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे साफ दुर्लक्ष करीत आहे. कंपनीकडे फोन केला असता कंपनीचे कर्मचाऱ्याकडून उडवा उडवीचे उत्तर देत आहेत. शेतकऱ्यांच्या पिकासह गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवला आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेतीचे धडे

## सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

बीड | प्रतिनिधी

आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी. यात जमिनीची योग्य निवड, सिंचन, खत आणि कीटकनाशकांचा योग्य वापर कसा करावा. तसेच पीक व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान कसे असावे याचे प्रात्यक्षिक थेट शेतीत केले जाते. दरवर्षी येथे विद्यार्थी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेती प्रात्यक्षिकांचे धडे प्रगतशील भारताच्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या



संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून दरवर्षी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला शेती विद्यार्थी, प्राध्यापक पिकवतात. त्यातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील सखोल माहिती मिळते.


कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष शेती व त्यातही शास्त्रीय दृष्ट्या व्यवस्थापन करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर घरच्या शेतीत किंवा नोकरी व्यवसायात त्याचा चांगला उपयोग होतो. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, प्रा. श्याम भूतडा, प्रा. अमोल सानप, प्रा.जुबेर बागवान. प्रा ज्ञानेश्वर गव्हाणे. प्रा. सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी हा अनुभव दरवर्षी घेतात. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी घडला पाहिजे. तो केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादीत न राहता. तो त्या-त्या क्षेत्रात प्रत्यक्ष उतरला पाहिजे यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विविध उपक्रम राबवले जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चालू हंगामात २० गुंठ्यांत कलिंगडाचे १५ टन इतके विक्रमी उत्पादन घेऊन किमया केली. या कलिंगड उत्पादनातून त्यांनी दीड लाख रुपयांचे उत्पादन देखील मिळवले. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांनी कोणत्या हंगामात कोणते पिक घ्यावे त्या संदर्भात शेतीची मशागत कशी आणि केव्हा करावी. पिक घेतांना कोणते औषध केव्हा आणि किती फवारावे. या संदर्भात शेतकऱ्यांना कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात करण्यात येणार आहे.

## खजुराच्या लागवडीतून लाखोंची कमाई

आजकाल भारतात कोणत्याही एका पॅटर्नचे पालन करून शेती केली जात नाही. आता भारतातील शेतकरी नवनवीन पद्धती आजमावत आहेत. शेतकरी आता मोठ्या प्रमाणात फळांची लागवड करत आहेत, ज्यातून त्यांना भरपूर नफा मिळत आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये हंगामानुसार शेती वेगवेगळ्या पद्धतीने केली जाते. राजस्थानमध्ये खजूर लागवडीमुळे शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. याशिवाय गुजरात, केरळ आणि तामिळनाडूत येथील शेतकऱ्यांना खजूराच्या लागवडीतून लाखोंचा नफा मिळत आहे.

साधारणपणे आखाती देशांमध्ये खजुराची लागवड अधिक होते. जगात सर्वाधिक खजुरांची लागवड इराणमध्ये केली जाते. त्यामुळे आता भारतातही या शेतीकडे लोकांचा कल खूप वाढला आहे. भारतात राजस्थान, गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये खजूरांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मात्र आता इतर ठिकाणीही खजूर लागवड होऊ लागली आहे.

एका खजुराच्या झाडाला ७० ते १०० किलो खजूर मिळतात. म्हणजेच आकडे बघितले तर



खजुराच्या लागवडीतून एका वर्षात अंदाजे ५ हजार किलो खजूर तयार होतात. बाजारात खजुरांना खूप मागणी आहे, त्यामुळे शेतकरी या शेतीतून लाखोंची कमाई सहज करू शकतात. एका झाडापासून ५० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते.अशी करा खजुराची शेती : खजुराची लागवड करण्याचा उत्तम काळ जुलै ते सप्टेंबर दरम्यान असतो. ही वनस्पती कोणत्याही प्रकारच्या जमिनीत लावता येते. या रोपांची लागवड करताना दोन खजुराच्या रोपांमधील अंतर ८ मीटरपेक्षा जास्त असावे हे लक्षात घेतले पाहिजे.खजुराची झाडे लागवडीनंतर ३ वर्षांनीच फळ देण्यास सक्षम होतात. खजुराच्या झाडांना जास्त सिंचनाची आवश्यकता नसते. परंतु उन्हाळी हंगामात महिन्यातून १५ ते २० दिवसांनी पाणी द्यावे. त्यामुळे हिवाळ्याच्या काळात महिन्यातून एकदा पाणी दिल्यासही फायदा होऊ शकतो.

## बीटल शेळी बंदिस्त शेळीपालनासाठी उत्तम पर्याय

शेळी पालन हा शेतीपूरक व्यवसाय असून, कमी भांडवल व कमी जागेत हा व्यवसाय करता येण्यासारखा आहे. ज्यामुळे सध्या अनेक शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेळीपालन करताना दिसून येत आहे. शेळयांना इतर जनावरांपेक्षा जसे की गाय, म्हैस यांपेक्षा खूप कमी प्रमाणात खाद्य लागते. साधारणत: एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये १० शेळ्या पाळल्या जाऊ शकतात. त्यामुळे अल्प भू धारकांसाठी हा व्यवसाय अतिशय फायदेशीर आहे. त्यामुळे आता शेळीपालन करण्याचा विचार करत असाल तर शेळीची योग्य जात निवडणे खूप आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर 'बीटल शेळी' या शेळीच्या प्रजातीबद्दल माहिती जाणून घेणे आवश्यक ठरते.

बीटल शेळी ही भारतातील पंजाब प्रांतातील एक जात आहे. शेजारील देश असलेल्या पाकिस्तानमध्ये दूध आणि मांस उत्पादनासाठी या प्रजातीची शेळी पाळली जाते. शेळीची जात जमनापारी शेळी आणि मलबारी शेळी यांसारखी असते. या शेळीला 'लाहोरी बकरी' असेही म्हणतात. मोठ्या शरीराच्या आकारासह ते चांगले दूध काढणारे मानले जाते. कान सपाट लांब कुरळे आणि झुकलेले असतात. या शेळ्यांची कातडी उच्च दर्जाची मानली जाते. संपूर्ण भारतीय उपखंडात स्थानिक शेळ्यांच्या सुधारणेसाठी बीटल शेळ्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या शेळ्या स्टॉल फीडिंगसाठी देखील अनुकूल आहेत, त्यामुळे सघन शेळीपालनासाठी प्राधान्य दिले जाते.



बीटल शेळीची वैशिष्ट्ये ? : या शेळीचे मुळस्थान पंजाबमधील गुरुदास हे आहे. ही शेळी दुधासाठी चांगली मानली जाते. या शेळ्या आकाराने मोठ्या असतात. यांचा रंग काळा असून अंगावर पांढऱ्या रंगाचे डाग असतात. कान लांब लटकलेले असतात आणि आत वाकलेले असतात. मादीचे वजन ४० ते ५० किलो व नराचे वजन ५० ते ८० किलो असते. एका वेतातील दूध उत्पादन ५ ते ७ लिटरपर्यंत जाते. ही शेळी बंदिस्त पद्धतीसाठी योग्य आहे.

कोणत्या जातीच्या शेळ्या पाळाव्यात ? : राज्यासह देशभरात शेळ्यांच्या अनेक वेगवेगळ्या जाती वेगवेगळ्या हवामानात व प्रदेशात आहेत. साधारणपणे, गवताळ प्रदेशातील शेळ्या मोठ्या आकाराच्या व वजनाच्या असतात. आपल्या देशाचा विचार करता देशाच्या भौतिक रचनेनुसार वेगवेगळ्या ठिकाणी विषम हवामान आढळते. हवामानानुसार त्या भागात वेगळे अस्तित्व असणाऱ्या जातीची जडणघडण झाली आहे.

## जाणून घ्या सोनचाफा रोपांची निवड ते विक्री

सोनचाफा म्हणजे सौंदर्याची उपमा. सोनचाफा म्हणजे वासाचा महिमा. व्यावसायिक फुलशेतीत पुढे जाण्याची क्षमता असूनही अशा गुणी फुलाला व्यापारी लागवडीत महत्त्व दिले जात नाही. सोनचाफा (शास्त्रीय नाव ''मायकेलिया चंपका') म्हटले की नजरेसमोर येते ते पिवळेजर्द टपोरे सुगंधित असे फूल. त्याची उपमा कोणी चाफेकळी म्हणून नाकाबरोबर करेल, तर कोणी चाफा बोलेना चाफा चालेना म्हणून चक्क नाकावरच्या रागरुसव्याशी करेल.

इतर पारंपरिक शेतीबरोबरच आपल्या देशामध्ये फुलशेती बऱ्यापैकी होत आहे. त्यामध्ये गुलाब, जरबेरा, कार्नेशन, शेवंती, मोगरा, जाई-जुई, लिली यांसारख्या फुलांना फुलांच्या बाजारपेठेमध्ये चांगली मागणी असून, आतापर्यंत काहीसे दुर्लक्षित व फुलशेतीमध्ये विशेष लागवड नसलेले सोनचाफ्याचे झाड. अशा दुर्मिळ सोनचाफ्यांची गुणवैशिष्ट्ये ओळखून त्याची कलमे करून अभिवृद्धी केल्यास अशा जातिवंत कलमांपासून आपणास फुलांचे उत्पादन घेणे शक्य आहे. कलमांची लागवड केली असता अशा झाडांपासून लवकर व झाडांची कमी उंची ठेवून आपणास फुलांचे उत्पादन घेता येते. यापासून आपणास फुले विकून पैसे तर मिळतातच, परंतु चाफ्याच्या सुगंधाने मन उल्हसित राहून ताणतणावांपासून मुक्त राहण्याचा आनंद मिळतो तो वेगळाच.

कलमे करून अभिवृद्धी : चाफ्याचे कलम जातिवंत मातृवृक्षावर भेट कलम पद्धतीने केले जाते. यासाठी मूळरोप चाफ्याचेच वापरले जाते.अशी कलमे झाडावर तयार होण्यास ४ ते ५ महिन्यांचा कालावधी लागतो. ही कलमे झाडावर तयार झाली, की पावसाळ्याच्या सुरवातीस झाडावरून उतरवून ती नर्सरीमध्ये मोठ्या पॉलिथिन बॅगमध्ये किंवा डब्यामध्ये जोपासना केली जाते. साधारणतः एक वर्षानंतर ही कलमे लागवडीस



योग्य होतात. अशी कलमे लावताना त्याची पूर्ण माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. फुलशेतीसाठी सोनचाफा लावताना त्याची निवड करणे हे फार महत्त्वाचे आहे. सोनचाफ्यामध्ये अनेक प्रकार असून, त्यांना फुले येण्याचा कालावधी वेगवेगळा आहे. यामध्ये प्रकारांबरोबरच फुलांचा रंगही वेगवेगळा असतो. त्यामुळे फुलांच्या बाजारामध्ये दराचा ग्राहकाचा व टिकाऊपणाचा विचार करून सोनचाफ्याची लागवड करावी. यासाठी गडद पिवळा व गडद केशरी किंवा सिमाचल केशरी यांची कलमे लावावीत. सर्वच चाफ्याच्या झाडांची पाने जवळपास एकसारखीच असल्याने त्यांना जातीनुसार ओळखण्याची सुविधा नाही. त्यामुळे कलमे खरेदी करताना मातृवृक्ष बाग पाहून त्यावरील फुले पाहून खात्रीच्या नर्सरीमधून कलमे खरेदी करावी. अन्यथा कलमे लावून मोठी झाल्यावर फार मोठे आर्थिक नुकसान होते.

जमीन :सोनचाफा लागवड करताना पाण्याचा निचरा उत्तमप्रकारे होणारी जमीन हवी. तसेच सूर्यप्रकाश भरपूर हवा. इतर झाडांची सावली असल्यास सूर्यप्रकाशाकरिता ही झाडे उंच वाढतात. नंतर फुले काढणे अवघड होते. पाण्याचा निचरा होणारी कोणतीही जमीन, कोणतेही हवामान या झाडांना मानवते. या झाडाचा नैसर्गिक आढळ उष्ण दमट हवामानात असतो. त्यामुळे जास्त पाऊस व आर्द्रतेच्या परिसरात याची वाढ चांगली होते.

लागवडीचा काळ :पाण्याची बारमाही सोय असल्यास कोणत्याही हंगामामध्ये लागवड करता येते. कलम लावताना खड्डा ६० सेंमी द ६० सेंमी. द ६० सेंमी, असा खणून त्यामध्ये कुजलेले कंपोस्ट खत, गांडूळ खत व शेणखताने अर्धा भरावा. दोन झाडांमधील अंतर ३ मीटर व दोन ओळींमधील अंतर ३ मीटर ठेवावे. कलमाचा डबा अथवा पॉलिथिन बॅग हलकेच काढून मुळांना इजा न करता कलम लावावे. कलमाचा जोड असलेला भाग जमिनीच्या वर ठेवावा, तसेच जोडाजवळ मूळरोपाला येणारे फुटवे वेळोवेळी काढावेत. ३ द ३ मीटर याप्रमाणे लागवड केली असता एका आरला १० झाडे बसतात. एकरी ४०० व हेक्टरी १००० कलमांची लागवड करता येते.

खते व पाणी व्यवस्थापन :झाडांना वेळोवेळी शेण खत, गांडूळ खत व स्टेरामिल ही खते वाढीनुसार द्यावीत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे. पावसाळ्यात कलमे लावलेल्या जागेमध्ये कोठेही पाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी. एक वर्षानंतर या कलमांना कळ्या येऊन फुले येऊ लागतात. सुरवातीस हे प्रमाण कमी जास्त असते. दोन वर्षांनंतर झाडांची वाढ जोमदार झाल्यावर प्रत्येक झाडाला सरासरी १५ ते २० फुले येतातच. फुले येण्याचा कमी जास्त काळ वगळता वर्षातून १८० दिवस फुले मिळतात. तीन वर्षानंतर झाडे चांगलीच जोमाने वाढून फुलांचे प्रमाण वाढते. झाडे अस्ताव्यस्त वाढून दाट होऊ नये यासाठी त्यांची छाटणी करून झाडे लहान ठेवता येतात. यामुळे फुले काढणे सोयीचे होते.

फुलांची काढणी :सकाळी लवकर फुले काढून ती जवळच्या बाजारामध्ये ३-४ तासातच पाठवावी. उन्हाने व धक्क्याने हे नाजूक फूल कोमेजते. यामुळे काढणी व विक्री या गोष्टी त्वरेने होणे महत्त्वाचे आहे. अशा फुलांना व्यापाऱ्यांकडून शेकडा ३० ते ४० रुपये दर मिळतो. सणासुदीच्या काळामध्ये यापेक्षा जास्त दर मिळतो. मेहनत व मशागतीचा खर्च वजा जाता हेक्टरी वार्षिक एक लाख रुपये तरी उत्पादन मिळते.योग्य बाजारपेठ :ही फुले दादर, पुणे, स्थानिक फूलबाजारात विकली जातात. सोनचाफ्याच्या झाडांवर आजपर्यंत कोणतीही रोगराई नाही, तसेच चाफ्याच्या झाडांबाबत साप येतो वगैरेसारखे गैरसमज आहेत. चाफ्यासारख्या दुर्मिळ वृक्षाचे जतन व्हावे हाच यामागे हेतू आहे.




### महत्वाच्या घटना

११५३ : माल्कम चौथा स्कॉटलंडच्या राजेपदी
१३२८ : फिलिप सहावा फ्रांसच्या राजेपदी
१७०३ : झार पीटर द ग्रेटने सेंट पीटर्सबर्ग शहराची स्थापना केली
१८१२ : ला कोरोनियाची लढाई.
१८१३ : १८१२चे युद्ध अमेरिकेच्या सैन्याने फोर्ट जॉर्ज किल्ला जिंकला.
१८८३ : अलेक्झांडर तिसरा, रशियाच्या झारपदी.
१८९६ : अमेरिकेच्या सेंट लुईस शहरात एफ.४ टोर्नेडो. २५५ ठार.
१९०५ : त्सुशिमाची लढाई.
१९०६ : महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना.
१९०७ : सान फ्रांसिस्को मध्ये प्लेगचा प्रादुर्भाव.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीने मॉडेल टी कारचे उत्पादन बंद केले व मॉडेल ए तयार करणे सुरू केले.
१९३० : त्याकाळी सर्वात उंच (३१९ मीटर १०४६ फूट) असलेल्या ख्रायसलर सेंटर या इमारतीचे न्यूयॉर्कमधे उद्घाटन झाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांनी देशात आणीबाणी जाहीर केली.
१९५१ : मुंबई येथे तारापोरवाला मत्स्यालय सुरू झाले.
१९६४ : गुलजारीलाल नंदा यांनी भारताचे हंगामी पंतप्रधान म्हणून कार्यभार स्वीकारला.
१९९४ : नोबेल साहित्य पुरस्कार विजेते रशियन लेखक अलेक्झांडर सॉल्केनिटसेन पाश्चिमात्य देशातील वीस वर्षांचा आपला वनवास संपवून आपल्या देशांत परतले.
१९९८ : ग्रँड प्रिन्सेस या जगातल्या (त्याकाळच्या) सर्वात मोठ्या व सर्वात महागड्या जहाजाने आपल्या पहिल्या सफरीला सुरुवात केली.
१९९९ : आंतरराष्ट्रीय न्यायालयाने हेग येथे स्लोबोदान मिलोसेविचवर कोसोवो मध्ये माणुसकीविरुद्ध अत्याचारांबद्दल गुन्हा दाखल केला.
२००२ : नेपाल चे तत्कालीन पंतप्रधान देऊबा यांना तीन वर्षाकरिता पक्षातून बाहेर काढण्यात आलं.
२००६ : जावाच्या योग्यकर्ता शहरात भूकंप. ६,६०० ठार.
२००८ : भारत सरकारने सिमेंटच्या निर्यातीवर लावलेला प्रतिबंध मागे घेतला.
२०१० : भारतातील ओडिसा राज्याच्या बालासोर जिल्ह्यातील चांदीपूर या ठिकाणी अणु तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या धनुष आणि पृथ्वी २ क्षेपणास्त्रांची भारतीय लष्करी दलाने यशस्वी चाचणी केली.
२०१६ : हिरोशिमा पीस मेमोरियल पार्क आणि हिबाकुशाला भेट देणारे बराक ओबामा अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती आहेत.

### जन्मदिवस | जयंती | वाढदिवस

१३३२ : डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे, कादंबरीकार, कवी, मर्मग्राही समीक्षक
१९१३ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे २००४)
१९२३ : अमेरिकेचे ५६ वे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते हेन्री किसिंजर यांचा जन्म.
१९३१ : पद्मश्री, पद्मविभूषण तसचं, संगीत क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार आणि उत्कृष्ट साहित्य क्षेत्रांतील सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय लेखक, कवी, नाटककार, अनुवादक, आणि गीतकार डॉ. ओट्टाप्लाक्कल नीलकंदन वेलु कुरुप यांचा जन्मदिन.
१९३६ : भारतीय धावपटू आणि पत्रकार रणजीत भाटीया यांचा जन्मदिन.
१९३८ : कादंबरीकार डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे यांचा जन्म.
१९५७ : भारतीय वकील आणि राजकारणी नितीन गडकरी यांचा जन्म.
१९६२ : भारतीय क्रिकेटर रवी शास्त्री यांचा जन्म.
१९६३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय अमेरिकन व्यवसायिक तसचं, अॅडोब इंक चे माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शंतनू नारायण यांचा जन्मदिन.

### मृत्यू | पुण्यतिथी | स्मृतिदिन

१९१० : नोबेल पारितोषिक मिळालेले जर्मन डॉक्टर रॉबर्ट कोच यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८४३)
१९१९ : भारतीय लेखक कंधुकुरी वीरसासिंगम यांचे निधन. (जन्म: १६ एप्रिल १८४८)
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई भीमराव आंबेडकर यांचे निधन.
१९६४ : पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे पहिले पंतप्रधान.
१९८३ : भारतीय राजकारणी व माजी लोकसभा अध्यक्ष तसचं, राजस्थान राज्याचे माजी राज्यपाल सरदार हुकम सिंह यांचे निधन.
१९८६ : प्रा. अरविंद मंगरुळकर, संगीत समीक्षक आणि संस्कृतचे अभ्यासक.
१९८६ : भारतीय राजकारणी, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री अजय मुखर्जी निधन. (जन्म: १५ एप्रिल १९०१)
१९९४ : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्रातील थोर विचारवंत, संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे मुख्य संपादक.
१९९८ : अर्थतज्ञ मिनोचर रुस्तुम तथा मिनू मसानी यांचे निधन. (जन्म: २० नोव्हेंबर १९०५)
२००७ : हॉट एअर बलून चे निर्माते एड यॉस्ट यांचे निधन. (जन्म: ३० जून १९१९)
२००८ : ऑस्कर पुरस्कार विजेते अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक, निर्माता आणि अभिनेता सिडनी इर्विन पोलॅक यांचे निधन.
२०१६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित धाडसी भारतीय लष्कर सैन्याच्या आसाम रेजिमेंटचे शिपाई हवालदार हंगपन दादा यांचे निधन.

# आंबेडकरी विचार मोर्चाचे जिल्हा वक्फ कार्यालय समोर निदर्शने

## भू माफियांनी कब्रिस्तानची जागा सुद्धा सोडली नाही- सय्यद सलीम बाबू

बीड । प्रतिनिधी

देवस्थान इनामी जमिनीची खुलेआम अवैध प्रकारे होत असलेली खरेदी - विक्री तात्काळ थांबवा या मागणीसाठी आज जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे आंबेडकरी विचार मोर्चा,आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. बीड जिल्ह्यामध्ये वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची खुलेआम खरेदी - विक्री होत असून जिल्हा वक्फ अधिकारी यांनी तातडीने पंचनामे करून अवैध खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे या मागणीसाठी आज जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे आंबेडकरी विचार मोर्चा, आंबेडकर रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाध्यक्ष एड.ए.एन सय्यद यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने




करण्यात आली.बीड जिल्हामध्ये वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जवळपास तीस हजार एकर इनामी जमीन असून त्याचा सर्वसामान्य जनतेसाठी काय वापर झाला ? जिल्ह्यातील भू माफियांनी कब्रिस्तानची जागा सुद्धा रिकामी सोडली नाही कब्रिस्तान जागेवर सुद्धा टोळेजंग इमारती बांधून अतिक्रमण केलेली आहे यावर वक्फ मंडळ कार्यालय काय करीत आहे ?.असेर आंदोलनात कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना सय्यद सलीम बापू म्हणाले.

बीड जिल्ह्यातील वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची जिल्हाभरात स्थानिक नेते व भू माफिया यांच्या संगणमताने खुलेआम मोठ्या प्रमाणात खरेदी - विक्री होत आहे व त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात बोगद खालचे सुद्धा झाले असून या संदर्भात आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने वेळोवेळी जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून असे एकूण बारा अर्ज जिल्हा वक्फ अधिकारी यांना देण्यात आले होते तरी वरील प्रकरणे जिल्हा व अधिकारी यांनी उदासीनता दाखवून आज पर्यंत अवैध प्रकारे होत असलेल्या खरेदी - विक्रीवर प्रकरणी कसलीही कार्यवाही केली नसल्याने हे सर्व प्रकार जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या संगनमताने होत असल्याचे दिसत आहे.जिल्हा वक्फ अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग न करता त्यांनी आपला मनमानी कारभार थांबवावा.

जिल्ह्यातील वक्फ मंडन कार्यालय अंतर्गत १९६० ते २०२५ पर्यंत देवस्थान इनामी जमिनीचे एकूण किती खालसे झालेले आहेत व त्याचप्रमाणे बीड जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत किती इनामी जमीन खिदमत माशा आहे व किती इनामी जमीन मदत माश आहे व मंडळ अंतर्गत येणाऱ्या किती जमिनीची विरासत झालेली आहे, किती जमिनीची विरासत झालेली नाही व किती जमिनींची अजून बाकी आहे, किती जमिनी वादग्रस्त आहे व किती जमिनींचे कोर्टात स्टे ऑर्डर आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी व त्याचप्रमाणे ज्या जमिनींची विराच झाली नाही त्या जमिनी तातडीने लावणी काढण्यात यावी.

तरी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी अवैध प्रकारे खरेदी - विक्री प्रकरणी तातडीने पंचनामे करून वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे अवैध प्रकारे खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी सय्यद सज्जाद पट्टेदार,शेख इलियास, काशिनाथ आरगडे,समीर सिद्दिकी,किशोर डोंगरे,इमरान शेख,सय्यद दस्तगीर सह आंबेडकरी विचार मोर्चाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ११वी एचएससी व्होकेशनल ला ऑफलाइन प्रवेश होणार

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मध्ये इयत्ता अकरावी मध्ये किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम म्हणजेच एच एस सी होकेशनल ला ऑफलाइन प्रवेश देण्यात यावेत असे शासनाने काढलेल्या पत्रकात सुचित केले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये विविध व्यवसाय अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीला विविध अभ्यासक्रमांना( ट्रेडला )ऑफलाइन प्रवेश देणे चालू आहे. रोजगार व रोजगार च्या दृष्टीने महाराष्ट्रामध्ये किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम म्हणजेच एचएससी व्होकेशनल कोर्सेस गेल्या अनेक वर्षापासून चालू आहेत. यामध्ये इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी ,एम एल टी, शिओ एच एस ,कृषी शाखा, कॉमर्स ग्रुपमध्ये अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट, बँकींग,फायनान्सीएल सर्व्हिसेसअँड इन्शुरन्स लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट,बेकरी ऍंड कन्फेशनरी कुक्कुटपालन ,फिशरी, उद्यान विदया, अशा अनेक शाखेमध्ये प्रवेश देणे चालू आहे. तरी दहावी, बारावी,उत्तीर्ण विद्यार्थी, पालक यांना कळविण्यात येते की विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी रोजगार आणि स्वयंरोजगार निर्मितीसाठी बीड जिल्ह्यातील विविध व्होकेशनल कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीसाठी प्रवेश घेण्यात यावे, असे बीड जिल्हा व्यवसाय शिक्षण कनिष्ठ महाविद्यालयीन कर्मचारी महासंघ म.रा. यांच्या वतीने कळविण्यात येते.

शासनाच्या नियमावलीप्रमाणे शिष्यवृत्ती, ईबीसी सवलत, विविध मल्टिनॅशनल कंपन्या, खाजगी आस्थापना, यांच्यामध्ये रोजगाराच्या संधी, शिकवू उमेदवारी व तसेच पुढील पदवी शिक्षणासाठी बी. ए./बी. कॉम/ बी.एससी इत्यादीसाठी प्रवेश मिळतो व इतर सर्व सवलती नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना देण्यात येतात, असे आवाहन प्रा.लक्ष्मीकांत देशमुख, प्रा. छाया खोसे, प्रा. जावेद पाशा, तसेच प्रा. राजकुमार कागदे, प्रा. शिवाजी खांडे, प्रा. डॉ.दीपक देशमुख, प्रा. सुधीर नंद, प्रा. देशपांडे आनंद, प्रा. नारायण घोलप, प्रा. नितीन गांधी, प्रा. सानप सर, प्रा. सातपुते सर, प्रा. शाहूराव साखरे सर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंटचे बाकडे तोडले

## शिवाजीनगर पोलिसांचे साफ दुर्लक्ष - एस.एम.युसूफ़

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर प्रवाशांना बसण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सिमेंटच्या तीन बाकड्यांपैकी एक तोडल्याचे दिसून आले आहे. मात्र याकडे शिवाजीनगर पोलीस ठाणे कर्मचाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसदी पत्रकात नमूद केले आहे की, समाजात असे काही लोक असतात जे परोपकारी विचाराने समाजासाठी, लोकांसाठी काहीतरी करतात. मात्र अशा लोकांनी लोकांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्वच समाजाला किंवा लोकांना असल्याचे दिसून येत नाही. म्हणूनच की काय बार्शी रोडवरील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर असलेल्या बस थांब्यावर बसची वाट पहात मोठ्या संख्येने उभे राहणाऱ्या प्रवाशांसाठी सिमेंटचे तीन बाकडे ठेवण्यात



आले होते. यापैकी सिमेंटचे एक बाकडे तोडून टाकलेल्या अवस्थेत दिसून आले आहे. हे पाहता उर्वरित दोन सिमेंटच्या बाकड्यांसोबत सुद्धा कधी काय घडेल हे सांगता येत नाही. आता त्या तुटलेल्या बाकड्यावर पाय देऊन काही टारगट मुले शिवाजीनगर पोलीस ठाणे च्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल बघण्यात व्यस्त झालेले दिसून येतात. हे पाहता अशाच मुलांनी बसण्याच्या बाकड्यावर उड्या मारून तर ते तोडले नसावे ना असा प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून लोकांनी लोकांसाठी करावं तरी काय? लोकांना काहीच समजत नाय. प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंट चे बाकडे तोडून टाकले हाय. असे म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही. तर याकडे शिवाजीनगर पोलिसांचेही साफ दुर्लक्ष असल्याचे यामुळे दिसून आले आहे. यामुळेच येथे एका बाकड्याची तोडफोड करून नासधूस करण्यात आली आहे. हे कमी होते की काय तरुण मुले-मुली या बाकड्यांवर पाय ठेवून शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल पाहण्याचा उद्योग करत असताना पोलीस कर्मचारी त्यांना साधे हटकत सुद्धा नाहीत. अशा हलगर्जीपणामुळेच उरफाट्या टाळक्यांचे फावते आणि त्यांच्याकडून इतरांना त्रास होईल असे उद्योग केले जाते मात्र शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांना याचे कुठलेही सोयरसुतक नसल्याचे दिसून येते. असेही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

# मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव

## उपस्थित राहण्याचे संयोजन समितीचे आवाहन

बीड/प्रतिनिधी

चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारुर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश



सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ॲड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ॲड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे.असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

# जिर्ण झालेले विद्युत पोल तात्काळ बदला-नुमान चाऊस

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील विविध भागातील विद्युत वाहक पोल हे जिर्ण झाले आहेत. त्यामुळे ते कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्या करीता विज महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलून पर्यायी पोल उभरावे अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.




माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यासह गल्ली बोळातील विद्युत पोल हे अनेक पर्षापासून बदलण्यात न आल्याने ते जिर्ण झालेले आहेत. त्यामुळे ते केंव्हाही कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्यामुळे प्रामुख्याने माजलगाव शहरातील मोगल मोहल्ला व अरब गल्ली भागात विज वाहक पोल हे जमिन लेवलला जिर्ण झाले असून ते धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. परंतू महावितरण कंपनीला या विद्युत वाहक पोल बदलने व जिर्ण झालेल्या तारा बदलण्यात कसल्याच प्रकारे कर्तव्य जाणून येत नाही. तरी तात्काळ महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलावेत अन्यथा काही अनुचित प्रकार घडल्यास या सर्व प्रकारास महावितरण कंपनीचा अनागोंदी कारभार कारणीभूत ठरणार आहे. तात्काळ हे पोल बदलावे व भविष्यात होणारी जिवीत हानी व अनुचित प्रकार महावितरण कंपनीने टाळावा अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.

# पाटोदा शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग पैठण पंढरपूर अर्धवटच

पाटोदा। प्रतिनिधी

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे शहरातील अर्धवट रस्त्याचे काम सुरू केले काम निवेदनेद्वारे प्रमाणे केले नाही. शिवाय मुख्य रस्त्यास जोडणाऱ्या छोट्या रस्त्यांची गटारीची कामे अर्धवट आहेत जोड रस्त्याच्या अर्धवट कामामुळे शहराच्या जवळपास अर्ध्या भागाचा ग्रामीण रुग्णालय आणि समशान भूमीकडे जाणारा रस्ता बंद आहे. पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग शहरातून जातो छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून रस्त्याला सुरुवात होते मुख्य रस्त्याला माळ गल्ली भाजी मंडई महासंगी रस्ता मोहल्ला रस्ता गोडाऊन रस्ता जुने बस स्टॅन्ड डोर गल्ली रस्ता पाटील गल्ली रस्ता भीम नगर रस्ता असे जोड रस्ते आहेत निवेदनेप्रमाणे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या प्रत्येक लहान रस्त्याचे काही अंतरापर्यंत करणे आवश्यक आहे प्रत्यक्षात कंत्राट दाराने असे काम केले नाही आणि महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी असे कामे करून घेतले नाही शिवाय रस्त्याकडे नाल्याचे बांधकाम अर्धवट आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल कागदे कुटुंबाच्या हाती- कांबळे

## ईश्वरजी कागदे यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात समाजभूषणांचा भव्य गौरव

परळी । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची लढाई कागदे परिवार लढत आहे. दलित पँथरपासून सुरु झालेला नामांतर चववळीचा इतिहास व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत असलेला समाज या बाबात विस्तृत मार्गदर्शन करुन कागदे परिवाराची या सामाजिक समतेच्या वैचारिक लढाईत मोलाचे योगदान देत आहे. स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मरणार्थ प्राचार्य कमलाकर कांबळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सिद्धार्थ नगर बौद्ध विहार येथे पार पडलेल्या कार्यक्रमास शहरातील विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. कार्यक्रमाची सुरुवात भगवान तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपल्या विचारमंथनातून उपस्थितांना विचारांनी उजळून टाकले.

पुढे बोलतांना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे म्हणाले, ''कागदे कुटुंब हे स्मरणातच नव्हे तर कृतीतून आंबेडकरी विचारांची मशाल पुढे नेत आहे. दलित पँथरच्या चळवळीपासून ते नामांतर लढ्यापर्यंतचा इतिहास हा केवळ संघर्षाचा नव्हे, तर समाजजागृतीचा आहे. कागदे कुटुंब त्या लढ्याचे आजचे



वैचारिक शिलेदार आहेत असे ते म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जो समतेचा, न्यायाचा, बंधुत्वाचा आणि परिवर्तनाचा विचार भारताला दिला, त्या विचारांची मशाल आजही अनेक कार्यकर्ते आपल्या छातीशी कवटाळून चालत आहेत. त्या वैचारिक दीपशिखेला नवा उजाळा देणारा आणि समाजासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणारा 'स्मृतीशेष ईश्वरजी कागदे समाजभूषण पुरस्कार' सोहळा परळी शहरातील सिद्धार्थ नगर येथील बौद्ध विहारात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांच्यासह डॉ. राजेश इंगोले (मानसोपचारतज्ज्ञ) यांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भावनाविवश होत डॉ. इंगोले म्हणाले, ''मी आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केले. पण माझ्या समाजाने दिलेला हा 'समाजभूषण' पुरस्कार हा माझ्यासाठी सर्वोच्च आहे. याचे मोल माझ्या हृदयात अमूल्य आहे.'' यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान, त्यांच्या ग्रंथसंपदेचे महत्व आणि तथागत बुद्धांच्या धम्मविचारांचे सखोल मार्गदर्शन त्यांनी केले. या कार्यक्रमात महादेव किरवले (उपजिल्हाधिकारी), प्रा. डॉ. माधव रोडे, प्रा. डॉ. विनोद जगतकर, प्रा. डॉ. संजय जाधव, डॉ. सिद्धार्थ तायडे, चेतन चोपडे, प्रा. डॉ. सुजाता धन्वे, प्रा. डॉ. विक्रम धन्वे, प्रा. डॉ. सचिन भूंबे, रामदादा किरवले, डॉ. धम्मपाल घुमरे, भैय्यासाहेब आदोडे, इत्यादी अनेक क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. दिलीप उजगरे यांनी केले. सूत्रसंचालन बा.सो. कांबळे यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत केले. उपस्थित मान्यवरांनी कागदे कुटुंबाच्या सामाजिक योगदानाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या शेवटी युवा नेते सचिनभाऊ कागदे यांनी आभारप्रदर्शन करताना सांगितले की, ''पुढील वर्षी स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा पुरस्कार अधिक भव्य आणि व्यापक स्वरूपात साजरा केला जाईल. पुरस्कारासोबत बाबासाहेब आणि तथागत बुद्ध यांच्या विचारांची मौलिक ग्रंथसंपदा देण्यात येईल, जेणेकरून हा पुरस्कार प्रेरणेचे स्रोत ठरेल. या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने, केवळ गौरव नव्हे तर एक सामाजिक चळवळ पुन्हा चेतवली गेली. कागदे कुटुंब हे आंबेडकरी विचारांचे दीपस्तंभ बनून समाजासाठी वैचारिक प्रकाश देत आहे, हे या कार्यक्रमाने सिद्ध केले.

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम-रत्नपारखी

माजलगाव। प्रतिनिधी

अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त माजलगाव भाजपा व जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन माजलगाव भाजपा शहराचे शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी सोहळ्यानिमित भाजपा व संयोजक समितीच्या वतीने श्री सिद्धेश्वर विद्यालय भारत माता सभागृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून दि ३० मे रोजी समाजाप्रती कार्य करणाऱ्या ११ महिलांना अहिल्या रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्यायाबद्दल निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे व निबंध स्पर्धेत सहभाग घेतलेल्या अकरा स्पर्धकांचे बक्षीस वितरण कार्यक्रम समारंभ होणार आहे. तसेच अहिल्यादेवी यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी चित्र प्रदर्शनीचे उद्घाटन करून चित्र प्रदर्शन होणार आहे. दिनांक २७ रोजी रोजी माजलगाव तालुक्यातील देवखेडा , येथील



केदारेश्वर महादेवाच्या मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून या ठिकाणी आरती करण्यात येणार आहे. दि. ३० मे रोजी सायंकाळी या अहिल्यादेवी देवी होळकर यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रसिद्ध व्याख्याते अशोक बांगर यांचे व्याख्यान होणार आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त भव्य व्याख्यान व विविध कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजलगाव भाजपा शहराचे मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

मंगळवार, दि.२७ मे २०२५ | ६

# सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत मोडकळीस

## आरोग्य सेवाच झाली मृत्युचा सापळा –समाजसेवक परमेश्वर घोडके

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे असणारे प्राथमिक आरोग्य केंद्र येथील ईमारत अतिशय धोकादायक झाली आहे.सध्या पावसामुळे ईमारत आतल्या बाजूने अनेक ठिकाणी पडझड होत असुन या ठिकाणी काम करणे किंवा रुग्णांना सेवा पुरविणाऱ्यासाठी कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत होतं असल्याचे दिसून येत आहे तरीही येथील कर्मचारी जीव मुठीत घेऊन रूग्णांना सेवा देत आहेत परंतु खंत ही वाटते ही वाटते की सदर ईमारत ही २०१

१६ पासुन ही ईमारत ना दुस्तत असुन सुद्धा प्रशासन कर्मचारी व रुग्णाणांच्या अपघाती मृत्यू ची वाट पाहत आहे का...?हे माहिती असुन देखील नवीन ईमारत बांधकाम व्हावे यासाठी समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी गेल्या दोन वर्षांपूर्वी अमर उपोषण करून या आरोग्य केंद्राची दशा व्यथा सरकार व स्थानिक प्रतिनिधी म्हणजेच आष्टी पाटोदा शिरूर येथील आजी माजी आमदार यांना सांगितले होते या आरोग्य केंद्राला नविन वास्तू उभारण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी विधानसभेत प्रश्नं मांडुन मंजूरी देखील आणली परंतु पुढे काय झालं..? निवडणूक होताच स्थानिक प्रतिनिधी बदलले अन्?



झोपलेले लोक प्रतिनिधी अन्? प्रशासन यांनी मिळून सर्व कर्मचारी यांच्या व रुग्णांच्या जिवित हानी न होण्याबाबतच हमी पत्र द्यावं असं स्पष्ट प्रतिक्रिया...
परमेश्वर रामचंद्र घोडके (समाजसेवक)

प्रश्नं प्रलंबित पडला हा प्रश्नं स्थानिक प्रतिनिधी कोणत्याही पक्षाचा किंवा कोणी ही असो परंतु हा प्रश्नं ४४ खेड्यापाड्याचा मार्गी लावणे खुप गरजेचं आहे असा परखड शब्दात समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.




स्थानिक असणारे व मुख्यालय केंद्रामध्ये स्थायिक वास्तव करणारे म्हणतात की हे आरोग्य केंद्र म्हणजे सापाचे अन्? मरणाचे माहेर घर झाले असुन येथे २४तास काम करणे म्हणजे धोक्याचे आहे.
आरोग्य सेवक निकाळजे



जीव मुठीत घेऊन रुग्णांना सेवा देण्यासाठी आम्ही तत्पर आहोत परंतु...अशा पडझड झालेल्या वास्तू मध्ये २४ तास राहणं म्हणजे मृत्युला आमंत्रण देणं असे आहे व एखाद्या वेळेस पाऊसा अभावी आम्ही वेळेवर उपस्थित नाही होऊ शकलो तर...समाजाकडुन आम्हाला टोमणे मारले जातात.
डॉ.शेख मॅडम, (वैद्यकीय अधिकारी सु.देवळा)

# वादळी पावसाचा कहर : जहागीर मोहा येथील शेतकरी डांगे रशीद यांच्या घरावर वीज पडून लाखो रुपयांचे नुकसान

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जहागीर मोहा या गावात शनिवारी रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसाने मोठा कहर केला. यामध्ये शेतकरी डांगे रशीद सलाउद्दीन यांच्या शेतातील राहत्या घरावर साडे आठच्या सुमारास वीज कोसळली. या घटनेत घराची एक भिंत पूर्णपणे कोसळली असून घरातील वस्तूंनाही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र घरातील रहिवासी भयभीत झाले होते. विजेच्या या अचानक आघातामुळे परिसरात तात्पुरती घबराट निर्माण झाली होती. घटनेनंतर गावकऱ्यांनी धाव घेऊन मदत केली. कोसळलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्याखाली कोणीतरी अडकले आहे का, याची खात्री करून सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून किल्ले धारूर तालुक्यात पावसासोबतच विजांचा जोर वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून शेतीकामेही खोळंबली आहेत. विजेच्या धक्क्यामुळे अनेक ठिकाणी झाडे, वीजवाहिन्या आणि घरे यांचेही नुकसान झाल्याच्या घटना समोर येत आहेत. या घटनेमुळे डांगे रशीद सलाउद्दीन यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यांच्या राहत्या घराचे तसेच घरातील फर्निचर, अन्नधान्य व महत्त्वाच्या वस्तूंचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने या घटनेची तातडीने दखल घ्यावी, पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी गावातील शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी केली आहे.

प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने पाहून त्वरित कार्यवाही करावी, अन्यथा पीडित शेतकऱ्याला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल, अशी भावना स्थानिक शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.





**सुदैवाने जीवितहानी टळली; परिसरातील शेतकऱ्यांची तातडीने मदतीची मागणी**

# कृषी सहाय्यकांच्या धरणे आंदोलन

## कृषी पदाधिकारी युवाशक्तीचा पाठिंबा!

पाटोदा । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील सर्व कृषी सहाय्यकांच्या विविध मागण्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे कृषी सहाय्यक संघटनेच्या वतीने विविध मागण्या घेऊन बेमुदत धरणे आंदोलन विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर येथे सुरू आहे, या आंदोलनाला कृषी पदवीधर युवाशक्तीचे संस्थापक प्रवीण आजबे यांनी जाहीर पाठिंबा देऊन आंदोलनात सहभागी असल्याची जाहीर केले.

छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजी नगर येथे कृषी सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे या आंदोलनाला कृषी पदवीधर युवाशक्तीचे संस्थापक प्रवीण आजबे यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दर्शवला. तसेच उपस्थितांना संबोधित करताना पुढील तुमच्या सर्व आंदोलनांमध्ये सहभागी राहणार असल्याचे देखील जाहीर केलं. तसेच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून मागण्या मांडल्या लागलीच धस साहेबांनी कृषी मंत्री कोकाटे यांच्याशी मीटिंग घेऊन प्रश्न सोडवण्याचे आश्वासनही त्यांना दिले आहे.

कृषी सहाय्यकांच्या मागण्यासाठी आ.सुरेश धस घेणार पुढाकार




# सावंतवाडी उमरी येथील महालक्ष्मी लोकनाटय कला केंद्राचा परवाना रद्द

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक बीड यांनी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केजबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासअहवाल सादर केला असून सदरील अहवालामध्ये त्यांनी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज या ठिकाणी बाहेरील जिल्ह्यातून महिला आणून आरोपी हे वेश्या व्यवसाय करून घेत असे तपासात निष्पन्न झालेले आहे.

तसेच यापूर्वी सदरील लोकनाट्य कला केंद्र चालक यांच्यावर दिनांक ७.७. २०२३ रोजी पोलीस ठाणे केज येथे गुरनं १८८, १०९, ११४, २९०,३४,३७० (४) (५), ३७० (अ) ३७३, ३७६ (फ) (आय) भादवी सह कलम च४,६, १७, १८, २१ बालकांचे लैंगिक अत्याचार अधिनियम सह कलम ३,४,५,६,८,९२०१५ सह कलम ३ (२) () अजाज अप्रका सह कलम ६५ (ई) मु.आ.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरठिकाणी पुन्हा अशा स्वरुपाचा गुन्हा घडू नये पिडीत महिलांचे शोषण होऊ नये म्हणून त्यावर कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गुन्याचे घटनास्थळ महालक्ष्मी कला केंद्र, सर्वे नंबर १६०, सावंतवाडी (उमरी) ता. केज यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होऊन सदरचे कला केंद्र सिल होण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील प्रकरणास सुनावणी घेऊन सुनावणी अंति सदरील महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज यांना देण्यात आलेल्या लोकनाट्य कला केंद्राचा परवाना रद्द करण्याचे आदेश पारित केलेले आहे असे जिल्हाधिकारी बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# वर्षानुवर्षे एकाच तालुक्यात कार्यरत तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या शासन निर्णयानुसार बदल्या करा - अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

**महसूल प्रशासनातील तलाठी व मंडळ अधिकारी हे स्थानिक पातळीवर प्रशासनाचा कणा मानले जातात. मात्र, बीड जिल्ह्यातील अनेक तलाठी व मंडळ अधिकारी १० ते १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्यामुळे प्रशासनात पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे महसूल कामकाजात गैरव्यवहार, भ्रष्टाचार वाढल्याची तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.**

शासनाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी ३ ते ५ वर्षांचा कालावधी निश्चित केला असून, यानुसार बदल्या करणे आवश्यक असतानाही बीड जिल्ह्यातील अनेक अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. उपविभागीय कार्यालयातील आस्थापना विभागातून या बदल्या केल्या जात होत्या, त्यामध्ये आर्थिक व्यवहार व राजकीय हस्तक्षेपाचा आरोप वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून शासकीय कार्यालये व निवासस्थाने उभारली असतानाही अनेक तलाठी व मंडळ अधिकारी शहरातील खासगी इमारतींमध्ये कार्यालये थाटून काम करत आहेत. यामुळे सार्वजनिक पैशांची नासाडी होत असून, सामान्य जनतेस कार्यालयीन कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी, बीडचे मा. जिल्हाधिकारी यांनी याची गंभीर दखल घेऊन शासन निर्णयाच्या अधीन राहून वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी किंवा एकाच तालुक्यात कार्यरत असलेल्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात, शासकीय कार्यालये व निवासस्थाने वापरणे बंधनकारक करावे, तसेच आस्थापना विभागातील गेल्या १५ वर्षांतील बदल्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

# शिंदेवाडीत मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा

## श्रीमद् भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

**तालुक्यातील शिंदेवाडी येथे श्री विठ्ठल – रूक्मिनी, श्री भगवान शंकर व श्री गणपती मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळ्यानिमीत्त श्रीमद्? भागवत कथा व दोन दिवसीय किर्तन महोत्सवाचे आयोजन दि. २६ ते २८ मे दरम्यान ह.भ.प. महारूद्र महाराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.**

भागवत कथेला दि. २१ मे पासुन सुरूवात झाली आहे. कथा प्रवक्ते ह.भ.प. भागवताचार्य संतोष महाराज सोळंके आम्लेकर हे आहेत. दि. २६ सोमवारी सकाळी मुर्ती व कलशाची शोभायात्रा काढण्यात येणार असुन गुरूवर्य मनिषानंद महाराज पुरी मानवत यांच्या हस्ते कलशारोहन सोहळा होणार आहे. दि. २७ मगळवारी रात्री ह.भ.प. रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांचे हरिकिर्तन तर दि. २८ बुधवारी ह.भ.प. भागवताचार्य बाळु महाराज गिरगावकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. गुजरवाडी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मीक कार्यक्रमाचा पंचक्रोषीत भाविक – भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी व तरूण मंडळी शिंदेवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान या सोहळ्यास संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची देखील उपस्थिती असणार आहे.

# श्रीसावित्री सोलार कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक?

## अंबाजोगाई तालुक्यात फॉल्टी सौर पंप आणि कंट्रोलरचे वाटप, शेतकरी अडचणीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात श्रीसावित्री सोलर कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाली असून शेतकऱ्यांना फॉल्टी पंप आणि कंट्रोलर चे वाटप करण्यात आले आहे. शेतकरी वारंवार कंपनीकडे तक्रार करीत असून या तक्रारीकडे कंपनीकडून दुर्लक्ष होत आहे. श्री सावित्री सोलर कंपनीकडून बंद सौर पंपाचे वाटप केल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. फॉल्टी पंप आणि कंट्रोलर वाटप केल्याची तक्रार महावितरण कंपनीकडे अशोक वाघमारे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने मागील त्याला सौर कृषी पंप योजना सुरू केली. अंबाजोगाई तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी अर्ज केले. अनेक शेतकऱ्यांना सौर कृषी पंप मिळाले आहेत. काही शेतकऱ्यांनी सौर पंपासाठी श्री सावित्री सोलार कंपनीची निवड शेतकऱ्यांनी केली होती. त्यांना सौर पंपाचे वाटप देखील झाले. अंबाजोगाई तालुक्यात अकरा शेतकऱ्यांना तीन एचपी सौर कृषी पंपाचे श्री सावित्री सोलर कंपनीकडून वाटप करण्यात आले. या अकरा शेतकऱ्यांना बंद असलेले सौर कृषी पंप आणि कंट्रोलर वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतात सौर पॅनल बसविण्यात आले . बंद असलेले पंप



**आमच्या शेतात सहा मे रोजी श्री सावित्री सोलर कंपनीकडून सौर पंप बसवण्यात आला. हा पंप बंद आहे. कंपनीचे कामगार पंप सुरू करून न देताच तिथून निघून गेले. पंप खराब आहे कंपनीचे कर्मचारी येथील आणि तुमचा पंप सुरू करून देतील हे सांगून कंपनीचे कामगार सौर पंप बसवून निघून गेले. पंधरा दिवस झाले.कंपनीकडे अनेक वेळा तक्रार करूनही आमच्याकडे कोणी अजून देखील आले नाही.**

**अशोक वाघमारे शेतकरी धानोरा खुर्द ता. अंबाजोगाई**

# शिवसेनेच्या बीड तालुकाप्रमुखपदी संतोष जाधव

बीड । प्रतिनिधी

शिवसेना शिंदे गटाच्या बीड तालुका प्रमुखपदी संतोष जाधव यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते जाधव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांची उपस्थिती होती.

मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन रॅलीसाठी मंत्री संजय सिरसाट शनिवारी बीडमध्ये होते. हा कार्यक्रम झाल्यानंतर संतोष जाधव यांच्या शिवसेनेच्या बीड तालुकाप्रमुखपदी संतोष जाधव यांची निवड जाहीर झाली. त्यानंतर त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. शिवसेना पक्षासाठी संतोष जाधव यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची तालुकाप्रमुखपदी निवड झाली आहे. सामाजिक कार्यात जाधव हे नेहमीच अग्रेसर असतात. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच त्या निकाली काढण्याचे काम त्यांनी गत दोन वर्षांत केले आहे. तसेच नागरिकांना काही अडचण आल्यास मदतीला धावून जाणारा नेता म्हणून संतोष जाधव यांची ख्याती आहे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# बारामतीत रेकॉर्डब्रेक पाऊस; इंदापूर तालुक्यातील १५० घरांमध्ये पाणी शिरलं

बारामती । प्रतिनिधी

**बारामती तालुक्यासह इंदापूर तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे बारामती शहर तालुका व इंदापूर तालुक्यातील काही गावांमधील तब्बल १५० हून अधिक नागरिकांच्या घरात पाणी शिरले. तर पाण्यामध्ये अडकलेल्या काही नागरिकांना प्रशासनाने सुखरूप बाहेर काढले. बारामती शहरात एका दिवसात १८० तर आतापर्यंत ४८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली.**



बारामती शहर व तालुक्यासहलगतच्या इंदापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पावसाने हाहाकार माजवला. बारामती शहरात एका दिवसात १८० मिलिमीटर तर आत्तापर्यंत ३०७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. बारामतीची पावसाची सरासरी ४०० मिलिमीटर आहे, मात्र सरासरीच्या ९० टक्के पाऊस बारामती शहरात मेमध्येच झाला. बारामती शहरातील ७० घरांमध्ये पाणी शिरले असून यामध्ये २५ घरांची पडझड झाली आहे. बारामती शहरातील जवळची या ठिकाणी ओढ्यातील पाण्याचा अंदाज न आल्याने दुचाकी वर निघालेला रिपेश सिंग हा व्यक्ती पाण्यामध्ये वाहून गेला, मात्र सुदैवाने त्याने ओढ्याच्या पात्रातील कडेला असलेल्या एका झाडाला पकडून ठेवले, बारामती नगरपालिका अग्निशमन दल व बारामती एमआयडीसी अग्निशमन दलाच्या मदतीने त्याला सुखरूप बाहेर काढण्यात आले.

बारामती तालुक्यातील काटेवाडी या ठिकाणी काही घरांमध्ये पाणी शिरले होते, त्यामुळे पाण्याने वेढा दिल्याने अडकलेल्या नवनाथ देवकाते, पांडुरंग देवकाते, परशुराम देवकाते, अमोल देवकाते, अशा देवकाते, बापू नरूटे, किशोर देवकाते या व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यात आले. ढेकळवाडी या ठिकाणी देखील काही नागरिकांच्या घरात पाणी शिरले, त्या ठिकाणच्या नागरिकांची सोय मंदिर व शाळेमध्ये करण्यात आली.

इंदापूर तालुक्यातील सणसर याठिकाणी देखील आणि त्यांच्या घरामध्ये पाणी गेले. निरगुडे येथील ४० घरांमध्ये, शेटफळगढे येथे १५, लाकडी येथे दोन घरामध्ये, चिखली येथे १४ , कुरवली तसेच तावशी या ठिकाणी देखील काही घरांमध्ये पाणी शिरले. इंदापूर तालुक्यातील जांब या ठिकाणी नीरा नदीच्या बंधाऱ्यावर काम करत असलेले दोन कामगार पोकलेन मशीन सह पुरामध्ये अडकले, त्यांना प्रशासन व पोलिसांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. दरम्यान बाहेरून आलेल्या नागरिकांना बंद वाहतुकीमुळे अडकून बसण्याची वेळ आली.

# वैष्णवीची आत्महत्या नव्हे हत्याच; विजय वडेट्टीवारांचे खळबळजनक दावे

पुणे । प्रतिनिधी

मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणेने आत्महत्या प्रकरणात आतापर्यंत ती शशांक, सासरा राजेंद्र, सासू लता, नणंद करिष्मा, दीर सुशील या सर्वांना अटक करण्यात आली आहे. तरीही या प्रकरणातील आणखी एक आरोपी निलेश चव्हाण हा अद्याप फरार आहे. त्याचा शोध सुरू आहे. हे सर्व सुरू असताना वैष्णवीच्या शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. वैष्णवीच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा आढळून आल्या आहेत. याच दरम्यान काँग्रेसचे विधीमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज अनिल कस्पटे यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले .



कस्पटे कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर भेटीनंतर विजय वडेट्टीवार यांनी वैष्णवीने आत्महत्या केली नसून तिची हत्या करण्यात आल्याचा दावा केला आहे. यासंदर्भात वडेट्टीवार यांनी ट्विट करत पोस्ट शेअर केली आहे. पैशासाठी होणाऱ्या सासरच्या छळामुळे आत्महत्या केलेल्या स्व. वैष्णवी हगवने हिचे आई- वडील आणि कस्पटे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. वैष्णवीच्या आई वडिलांच्या वेदना आज शब्दांत मांडता येण्यासारख्या नाहीत.

वैष्णवीच्या शरीरावर आढळलेल्या जखमांवरून हे स्पष्ट होते की, ही आत्महत्या नसून सरळसरळ हत्या आहे. इतकी गंभीर घटना घडून सुद्धा पोलीस कारवाई संथ गतीने सुरू आहे, हे अत्यंत दुःखद आहे. राज्य महिला आयोगाने स्वतःहून कारवाईस पुढाकार न घेणे हे महाराष्ट्रासाठी खरोखर लज्जास्पद आहे. सरकारने तातडीने या प्रकरणात लक्ष देऊन वैष्णवी, तिच्या ९ महिन्याच्या बाळाला आणि कस्पटे कुटुंबाला न्याय द्यावा ही सरकारकडे मागणी आहे. असही त्यांनी म्हटलं आहे.

तर आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई होणार

दरम्यान, वैष्णवीच्या आत्महत्येप्रकरणी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. आरोपी असलेला सासरा राजेंद्र हगवणे याला २८ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात आरोपींवर अत्यंत कठोर कारवाई केली जाईल. नियमांचा अभ्यास करून, गरज भासल्यास आरोपींवर मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्याचाही विचार केला जाईल.

# पुण्यात पावसाचा पहिला बळी, अंगावर भिंत कोसळून महिलेचा मृत्यू

राज्यात मान्सून मे महिन्यातच दाखल झाला असून २६ मे रोजीच मुंबई पर्यत धडक दिली आहे. अनके जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. मे महिन्यात नदी नाले भरून वाहात आहेत. धरणांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे तर काही ठिकाणी धबधबेही प्रवाहीत झाली आहे. दरम्यान पुण्यातही मुसळधार पाऊस सुरू असून दौंड शहरात पावसाने पहिला बळी घेतला आहे. ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा अंगावर घराची भिंत पडून मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वृद्ध महिला दुकानात बसली होती. त्यावेळी दुर्घटना घडली. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातामुळे त्या गंभीररित्या जखमी झाल्या होत्या. रुग्णालयात उपचार सुरु असताना ताराबाई यांचा मृत्यू झाला. माहिती



मिळताच दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी घटनास्थळी भेट दिली.

मान्सून जवळपास संपूर्ण महाराष्ट्रात दाखल झाला आहे. रात्रीपासून मुंबईत मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. अनेक भागात पाणी साचलं असून रेड अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने मुंबईसह पुणे रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पालघरसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसंच नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांचं आवाहन


घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षा, बचाव आणि मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावं. उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सतर्क रहावं आणि सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे.

अजित पवार यांनी आज पुणे ग्रामीण भागातील गावाचा दौरा केला. यावेळी त्यांनी, मंत्रालयातील राज्यस्तरीय आपत्ती नियंत्रण व व्यवस्थापन केंद्राकडूनही अन्य जिल्ह्यातील पावसाचा आणि उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. शेती, पिके, पशुधन आणि घरांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# हगवणे पिता-पुत्रांना आसरा दिल्याने माजी मंत्र्यांच्या मुलासह ५ जणांना अटक

पुणे : शहरातील वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात पोलिसानी ५ जणांना अटक केली होती. त्यामध्ये, वैष्णवीच्या पती,सासू आणि नणंदेला सर्वात अगोदर अटक करण्यात आली होती. तर, फरार असलेल्या सासरा राजेंद्र आणि दीर सुशील हगवणे यांस मध्यरात्री बेड्या ठोकल्या होत्या. आता, याप्रकरणी, पोलिसांनी (ॆश्रिळलश) आणखी ५ जणांना अटक केली असून एका माजी मंत्र्यांच्या मुलाला देखील ताब्यात घेण्यात आलं आहे. पोलिसांनी अटक केलेल्या पाचही आरोपींना उद्या न्यायालयात हजर केले जाणार आहे. पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर पुण्यातून (झींपश) पळून गेलेल्या राजेंद्र आणि सुशील यांना आसरा देण्याच्या आणि पळून जाण्यासाठी मदत केल्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा सुशील हगवणे १७ मे ते २२ मे या कालावधीत अटक टाळण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी लपुन राहीले होते. या कालावधीत त्यांना आसरा देणाऱ्या ५ जणांना बावधन पोलीसांनी अटक केली आहे. त्यामध्ये, राजेंद्र हगवणे यांच्या मित्रासह कर्नाटकमधील एका



माजी मंत्र्यांच्या मुलाला देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. प्रितम वीरकुमार पाटील असं आरोपीचं नाव असून तो माजी मंत्री वीरकुमार पाटील यांचा मुलगा आहे. मोहन भेगडे (मित्र), मोहन बंडू फाटक (पवना डॅम जवळील फार्म हाऊसचा मालक), अमोल जाधव (सातारा जिल्ह्यातील पुसेगाव मधे हगवणे पिता पुत्रांना फार्म हाऊसवर आसरा देणारा), राहूल जाधव (सातारा जिल्ह्यातील पुसेगाव मधे हगवणे पिता पुत्रांना फार्म हाऊसवर आसरा देणारा ) आणि प्रितम वीरकुमार पाटील (काँग्रेसचे कर्नाटकातील माजी मंत्री वीरकुमार पाटील यांचा मुलगा, कर्नाटकातील कोगनोळी या ठिकाणी हगवणे पिता पुत्रांना आसरा दिल्याबद्दल अटक) यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. या सर्व आरोपींना उद्या न्यायालयात हजर केले जाणार आहे.

वैष्णवीच्या अंगावर २९ व्रण, सासरच्यांकडून छळ

वैष्णवी हगवणे हिने सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचललं. मात्र, आत्महत्या करण्यापूर्वी देखील वैष्णवीचा मोठा छळ करण्यात आल्याचं आता शवविच्छेदन अहवालातून समोर येत आहे. पोस्टमॉर्टम रिपोर्टमधून धक्कादायक माहिती समोर आली आहे. वैष्णवीच्या आत्महत्येच्या दिवसापर्यंत हगवणे कुटुंबियांकडून तिचा छळ करण्यात आला आहे. आत्महत्येच्या दिवसापर्यंत वैष्णवीला सासरच्या लोकांनी मारहाण केली. वैष्णवीच्या अंगावर मारहाणीचे एकूण २९ व्रण आहेत, त्यातील ५ ते ६ व्रण ताजे असल्याचे उघड झाले आहे. आत्महत्येच्या दिवसापर्यंत वैष्णवीचा छळ झाल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयाला दिली आहे.

# दोन तास आधी वाजणार भोंगा; धरणातून पाणी सोडण्यापूर्वीच यंत्रणा अलर्ट ठेवा

पुणे - मागील वर्षी खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर त्याची पूर्वसूचना नागरिक, तसेच पालिकेला देण्यात आली नव्हती. त्यामुळे शहरातील सिंहगड रोड परिसरातील घरांमध्ये पाणी शिरले होते, असा आरोप नागरिकांनी केला होता. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने ही बाब अंत्यंत गांभीर्याने घेतली आहे.धरणातून पाणी सोडण्याच्या आधी यंत्रणेला सज्ज होण्यासाठी दोन तास आधी सूचना देण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जलसंपदा विभागाला दिल्या आहेत. धरणातून विसर्ग करण्याचा इशारा यंत्रणा भोंग्याच्या स्वरूपात पाणी शिरण्याचा धोका असलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी बसवावी. त्याची माहिती पालिकेच्या नियंत्रण कक्षाने नागरिकांना द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

यंदा मान्सून लवकर येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. जलसंपदा विभागाकडून पूरस्थितीमध्ये नदीमध्ये धरणातून किती क्युसेक पाण्याचा विसर्ग केल्यानंतर शहरातील कोणकोणत्या भागांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, याची माहिती



महापालिकेला देण्यात आली आहे.

उदाहरणार्थ किती क्युसेक पाणी सोडले, तर भिडे पूल पाण्याखाली जातो. एकतानगर सोसायटीत किती क्युसेक पाणी आल्यावर ते घरांमध्ये शिरते, याची माहिती देण्यात आली. यासह सर्वसाधारण पाण्याची पातळी, सावधानतेची पातळी, धोक्याची पातळी आणि आपत्तीची पाणीपातळी या बाबीसद्धा समजून सांगण्यात आल्या.

महापालिका, पीएमआरडीए, जलसंपदा, बांधकाम विभागाला दिलेल्या सूचना

- नदीलगत व नदीकाठावरील बांधकामांवर ठळकपणे निळी व लाल पूर रेषा दर्शवावी
- नदीपात्रातील अतिक्रमणे पाहणी करून कार्यवाही करावी
- जलसंपदा विभागाने नदीत पाणी सोडण्यापूर्वी गतीने माहिती पोहोचवावी
- नदी पात्रातील राडारोडा हटवावा
- आपत्तीप्रसंगी आवश्यक जेसीबी, पोकलेन आदी यंत्रसामग्री गतीने उपलब्ध होण्यासाठी परिवहन विभागाने तयारीत राहावे
- रस्ते तुंबू नयेत, यासाठी नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करावी

मेट्रोला दिलेल्या सूचना

पुणे व पिंपरी चिंचवड पालिका क्षेत्रात मेट्रो रेल्वेमार्गिकेच्या व रस्त्यांची मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. नदीपात्र, तसेच रस्त्याच्या बाजूस कामांमुळे निर्माण होणारा मलबा लवकरात लवकरात काढून घ्यावा. ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते, तेथे सुरक्षा गार्ड, सुरक्षा रक्षकांना सज्ज ठेवून पोलीस विभागाशी समन्वय ठेवावा.

आरोग्य विभागाला दिलेल्या सूचना

आरोग्य विभागाने संभाव्य आपत्कालिन परिस्थितीचा विचार करून नागरिकांना तात्काळ सेवा मिळेल, याबाबत नियोजन करावे. तालुकानिहाय रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे, साधनसाहित्य तयार ठेवावे. साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत स्वतंत्र प्रणाली विकसित करावी. मान्सून काळात सर्पदंशाचे प्रमाण लक्षात घेऊन पुरेसा सर्पविष प्रतिबंधक लस साठा उपलब्ध ठेवावा.

जूनच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा बैठक

जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांना दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने त्या- त्या विभागाने काय कार्यवाही आणि उपाययोजना केल्या का, याचा आढावा घेण्यासाठी जूनच्या पहिल्या आठवड्यात सर्व विभागांची जिल्हाधिकारी पुन्हा बैठक घेणार आहेत. काही विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित न राहता त्यांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहतात. त्यामुळे पुढील बैठकीस प्रमुख अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# राजगुरुनगरमध्ये पावसाचा कहर; भीमानदीला पूर, पाभे गावाचा संपर्क तुटला

राजगुरूनगर : खेड तालुक्यातील भोरगिरी परिसरात झालेल्या जोरदार मान्सूनपूर्व पावसामुळे भीमानदीला मोठा पूर आला असून, परिणामी पाभे



गावातील पूल कम बंधारा पाण्याखाली गेला आहे. या पाण्याचा फुगवटा गावात शिरल्याने पाभे गावाचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला आहे.

भीमानदीवरील पूल कम बंधाऱ्याला बर्गे (ढापे) असल्यामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह थेट पुलावरून जात आहे. यामुळे पुलाची संरचना धोक्यात आली असून गावकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. फुगवटा वाढल्याने गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून, नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

भोरगिरी व भिवेगाव भागात कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमुळे पाण्याचा साठा वाढला असून, या परिसरातील काही घरे पाण्याखाली गेल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, पाऊस आता थांबला असला तरी परिसरात अजूनही पूरस्थितीचे सावट आहे.

या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. उन्हाळी बाजारी, कांदा आणि इतर नगदी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरले आहे. खेड तालुक्यातील भोरगिरी परिसरात सुमारे १५० ते २०० मिमी पाऊस झाला आहे. कळमोडी धरण परिसरात ७८ मिमी, चास कमान धरण परिसरात ५७ मिमी, तर भामा-आसखेड धरण परिसरात ४८ मिमी इतका जोरदार पाऊस नोंदविण्यात आला आहे. या आपत्तीतून तातडीने मदत कार्य हाती घेण्याची गरज असून, प्रशासनाने बाधित गावांना तात्काळ मदत पुरवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# निरा डावा कालवा फुटला, घरांसह शेतात घुसलं पाणी; बारामती परिसरात सतर्कतेचा इशारा

बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील लिमटेक परिसरात नीरा डावा कालव्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने कालवा फुटल्याची घटना घडली आहे. गेल्या तीन दिवसांपासून बारामती, पिंपळी, लिमटेक आणि काटेवाडी परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे ओढे आणि नाल्यांचे पाणी कालव्यात मिसळल्याने पाण्याचा दाब वाढला. यामुळे लिमटेकजवळील नीरा डावा कालव्यात भगदाड पडले आहे.



पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी दिलेल्या माहितीनुसार, कालव्यातील वहनक्षमता अचानक वाढल्याने ही घटना घडली. मान्सूनपूर्व पावसामुळे कालव्यातील पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्यास अडचणी निर्माण झाल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र शेतजमिनींचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

स्थानिक प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. कालव्याची दुरुस्ती करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीची वाट पाहावी असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचा मृत्यू; रुग्णाच्या नातेवाइकांचा आरोप

पौड: नांदगाव (ता. मुळशी) येथील शेतकरी शंकर तुकाराम पेरणेकर (वय ५२) यांना सर्पदंश झाल्याने पौड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, पौड रुग्णालयातून ससून रुग्णालयात नेत असताना त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे.

पेरणेकर यांना शेतात काहीतरी चावले असे वाटले. त्यामुळे त्यांनी पौड ग्रामीण रुग्णालयात जाऊन डॉक्टरांना तसे सांगितले. यावर डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले. उपचार चालू असताना संध्याकाळी पेरणेकर यांना अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णवाहिका बोलावून त्यांना ससून रुग्णालयात नेण्यात आले.

या वेळी स्वतः डॉ. विद्या कांबळे पेरणेकरांसोबत रुग्णवाहिकेतून गेल्या होत्या. ससूनमध्ये गेल्यावर तेथील डॉक्टरांनी पेरणेकर यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. मात्र, पेरणेकर यांच्या नातेवाईकांनी पौड ग्रामीण रुग्णालयात चुकीचे उपचार झाल्याचा ठपका ठेवला आहे.

पेरणेकर अस्वस्थ होताच त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्याची गरज होती. त्यामुळे त्यांचे नातेवाईक जवळच्या खासगी रुग्णालयात नेण्याची विनवणी करत होते. मात्र, पौड ग्रामीणच्या डॉक्टरांनी रुग्णाला जवळच्या खासगी रुग्णालयात नेण्याऐवजी दूर पल्ल्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये नेण्याचा आग्रह धरला.त्यात पौड ग्रामीणच्या रुग्णवाहिकेला चालकही उपलब्ध नसल्याने खासगी रुग्णवाहिकेची तासभराहून अधिक काळ वाट पहावी लागली. शिवाय एवढा वेळ जाऊन सुद्धा पौड ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिवसभरात तयार झालेले वैद्यकीय अहवाल तसेच उपचारासंबंधींचे कागद ससून रुग्णालयात जाताना सोबत ठेवले नाहीत, ही अक्षम्य चूक केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.याबाबत पौड ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. मीना इसवे व डॉ. विद्या कांबळे यांनी सांगितले की, पेरणेकर यांनी त्यांना शेतात काहीतरी चावले असल्याचे सांगितल्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करून घेण्यात आले.त्यानंतर त्यांची तपासणी केली असता वैद्यकीय अहवालात तसे काही आढळले नाही. त्यानंतरही त्यांच्यावर उपचार चालू ठेवले. मात्र, सायंकाळी त्यांना अत्यवस्थ वाटू लागले व आकडी येऊ लागली. त्यानंतर त्यांना आम्ही ससून रुग्णालयात घेऊन गेलो व तिथे त्यांचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले.स्वराज्य पक्षाचे मुळशी तालुकाध्यक्ष राजू फाले यांच्यासह शिवसेनेच्या स्वाती ढमाले, ज्ञानेश्वर डफळ, प्रमोद बलकवडे, नामदेव टेमघरे, किसन फाले व नांदगाव ग्रामस्थ यांनी पौडच्या वैद्यकीय अधिकार्यांना याबाबत जाब विचारत कारवाईची मागणी केली आहे.